# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००७ |
| वर्ष | : | आठवे |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ११९**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष आठवे / अंक ८ / जुलै २००७

## संपादकीय

### स्वातंत्र्याची साठी शांत करणाऱ्या देशाची नियती

पुढील महिन्यात स्वातंत्र्याचा हीरक महोत्सव साजरा करणाऱ्या आपल्या देशाची नियती इतकी विचित्र आणि तर्कातीत आहे की, स्वातंत्र्यपूर्व काळात जन्माला आलेल्या आणि आज अस्तंगत होत चाललेल्या जुन्या पिढ्यांबरोबर नवीन पिढ्यादेखील ''या देशात इंग्रजांचे राज्य होते, तेच बरे होते'' असे म्हणत आहेत.

नव्वद वर्षे विविध मार्गांनी लढा देत जे स्वातंत्र्य मिळवलं, त्यासाठी लाखो जणांनी प्राण पणास लावले, बलिदान केले, रक्त सांडले हा इतिहास आहे; परंतु या प्रदीर्घ कालखंडावर आपल्या कर्तृत्वामुळे ठसा उमटवून आपली कारकीर्द 'एक युग' म्हणून इतिहासात नोंदली जाईल अशी दोन नावे अजरामर ठरली. एक, तेल्यातांबोळ्यांचे पुढारी असणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि दुसरे, अभ्यासाचा गहन विषय ठरलेले मोहनदास करमचंद गांधी! यामध्ये 'सावरकर युग' नावाचे तिसरे युग अस्तित्वात आले असते, तर इतिहासाला वेगळेच वळण देणारे ठरले असते. पण देशासाठी सर्वस्व त्याग करणाऱ्या या महान देशभक्तावर कायम अन्यायच होत रहावा ही देखील या देशाची नियती आहे, हे देशाचे दुर्दैव!

इतिहासाचा विचार करताना 'जर' आणि 'तर' या शब्दांना काहीही अर्थ नसतो; हे खरे असले तरी आजच्या परिस्थितीत कोणाही सूज्ञ माणसाला असं वाटू शकतं, हे ही सत्यच आहे.

या व यांच्या सारख्या युगकर्त्या नेत्यांचे दुर्दैव असे त्यांच्या स्वप्नातला भारत, म्हणजेच अखंड हिंदुस्थान तर अस्तित्वात आलाच नाही; पण त्यांच्या पश्चात त्यांच्या तत्त्वांना आणि तत्त्वज्ञानांना हरताळ फासला जाईल, इतका काळ बदलला आहे. गांधीवादाची गांधीगिरी या शब्दाने संभावना केली जाते, तेव्हा राजकीय विचारांबाबत कितीही मतभेद असले तरी, 'स्वप्नातल्या' भारताच्या भविष्याबद्दल अनामिक चिंता मन कुरतडत राहते. सर्व दिशांनी अंधाराचे वादळ घोंघावत रहाते. इतकी मोठी उत्तुंग माणसे होऊन गेलेल्या देशाने त्या महापुरुषांना जणू त्यांच्या आदर्शांसह मातीत घालायचा चंगच बांधला आहे.

(पृष्ठ क्रमांक ४०वर )

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष आठवे / अंक ८/ जुलै २००७



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १२ वे / अंक १ला)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | महायोगी श्री अरविंदाचा स्वातंत्रलढ्यातील सहभाग -लेखांक १ | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | ३ |
| २) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | | १० |
| ३) | सूर्य देवता विषयक माहिती (लेखांक दुसरा) | श्री. शं.बा.मठ | १८ |
| ४) | श्री मच्छिंद्रनाथ | सौ. मालती देवधर | २३ |
| ५) | घर एक उद्योग (मंदिर) | डॉ. सौ. प्रभा जयंत कर्वे | २५ |
| ६) | दहशतवादाची दहशत | संहिता ज. करमळकर | २७ |
| २) | खरंच गरज आहे मराठीला 'रोमँटिक' करण्याची (एक प्रतिक्रिया) | श्रीमती आशा भिडे | ३० |
| ७) | दिशा : एप्रिल २००७ - एक अभिप्राय | श्री. सुरेंद्र लागू | ३३ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# महायोगी श्री अरविंदाचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग -
## लेखांक १

*स्वातंत्र्य समराचे १५० वे वर्ष व स्वातंत्र्याचे हीरक महोत्सवी वर्ष असल्याने, त्या पार्श्वभूमीवर श्री अरविंदांचा विशेष अभ्यास असणारे श्री. नाडकर्णी यांचा हा लेख -* संपादक

"A great worker and creator is not to be judged only by the work he himself did but also by the greater work he made possible."

हे शब्द आणि विचार आहेत महायोगी श्री अरविंदाचे. १९२० साली लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर त्यांच्या कार्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा गौरव करण्यासाठी लिहिलेल्या लेखातील हाच विचार वस्तुतः स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या योगदानालाही तंतोतंत लागू पडतो.

भारत स्वतंत्र होऊन ६० वर्ष होत आली. स्वातंत्र्याबरोबर जन्माला आलेली पिढी आज साठीच्या उंबरठ्यावर उभी आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या अखेरच्या पर्वातील सेनानींना या पिढीनं पाहिलं, त्यांच आदर्श जीवनही अनुभवलं. काळ पुढे जातो, तशी भूतकाळात जमा झालेली माणसं, त्यांचे कार्य, त्यांची वैशिष्ट्ये हळूहळू धूसर होऊ लागतात. आणि मग लक्षात राहतो तो फक्त एखाद्या महान कार्यसिद्धीचा अंतिम क्षण आणि त्या क्षणाचे मानकरी. यामुळेच स्वातंत्र्यलढ्याच्या पूर्वाधात ज्यांनी या महान कार्याचा पाया घातला, अशा अनेक थोर व्यक्तींच्या योगदानाचा आज समाजास विसर पडला आहे.

त्यातही महायोगी श्रीअरविंदांसारख्या व्यक्तीला लोक एक योगी म्हणून ओळखतात. काही काळ ते क्रांतिकार्य करत होते, हेही अनेकांना ठाऊक आहे. पण त्या कार्याचं महत्त्व आजही अनेकांना समजत नाही. याला कारणे दोन. एकतर, त्याचा तपशील आपणास ठाऊक नसतो व त्या काळांतील सामाजिक परिस्थितीचा आणि समाज-मनाचा आपणास अंदाज नसतो. या दोन्ही गोष्टींचा परिचय करून घेण्यापूर्वी, डॉ. करण सिंग यांच्या "Prophet of Nationalism" या श्रीअरविंदांवरील पुस्तकाच्या प्रस्तावनेत पं. जवाहरलाल नेहरू काय म्हणतात त्याकडे एक नजर टाकू,

"His whole career in active politics was a brieg one, from 1905 to 1910. During there five years he shone like a briliant meteor and created a powerful impression on the youth of India. The great anti-partition movement in Bengal gained much of its philosophy from him and, undoubtedly, prepared the day for the great movements led by Mahatma Gandhi."

पंडितजींच्या या उद्गारांवरून ३ मुद्दे स्पष्ट होतात. एक म्हणजे श्रीअरविंदांचा लढ्यांतील सक्रिय सहभाग जरी फक्त ५ वर्षांचा असला तरी, ते एखाद्या तेजस्वी धूमकेतुप्रमाणे चमकून गेले आणि विशेषतः तरुणांवर त्यांच्या विचारांची छाप पडली. दुसरं म्हणजे वंगभंगाच्या चळवळीची तात्त्विक बैठक त्यांच्याकडून मिळाली होती. आणि तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पुढे महात्माजींनी उभारलेल्या लढ्याचा पाया श्री अरविंदांनी केलेल्या वंगभंगाच्या चळवळीतूनच घातला गेला.

**१९व्या शतकातील सामाजिक परिस्थिती -**

वयाच्या ७व्या वर्षापासून १४ वर्षे इंग्लंडमध्ये राहून उच्च शिक्षण घेऊन श्री अरविंद १८९३ साली भारतात परत आले. त्यावेळी भारतातील परिस्थिती कशी होती? सारा भारतवर्ष एखाद्या थंड गोळ्याप्रमाणे निश्चेष्ट पडला होता. १८५७ चा उठाव फसल्यावर इंग्रजांनी आपली पकड घट्ट करण्यास सुरुवात केली. देशांतील सर्व छोटी मोठी राज्ये त्यांनी आधीच खालसा केली होती. राजेमहाराजांच्या पदरी असणारी त्यांची खाजगी सेना इंग्रजांनी प्रथम काढून घेतली. त्यांना निष्प्रभ केलं, आणि तनखे देऊन स्वस्थ बसवून ठेवलं. त्यामुळे देशांतील जवळ जवळ सर्व क्षात्रतेज संपुष्टात आलं.

१८३५ साली, मेकॉले साहेबांनी उघडलेल्या "डेअरी" तून मिळणारं "वाघिणीचे दूध" पिऊन बौद्धिक ताकद प्राप्त केलेला नेटिव्ह साहेबांचा एक नवा वर्ग निर्माण झाला होता. इंग्रजी भाषा शिकून लठ्ठ पगार घेणाऱ्या या नेटिव्ह साहेबांना इंग्रजांची चाकरी करण्यात धन्यता तर वाटतच होती पण शिवाय साहेबाचे राज्य आले ही देवाची कृपा वाटू लागली होती.

१८५७ सालचा उठाव फसल्यावर इंग्रजांनी हळूहळू राज्यकारभारात सुसूत्रता आणली. संपूर्ण देशाची प्रांतवार आणि प्रत्येक प्रांताची जिल्हावार विभागणी केली. प्रत्येक जिल्ह्यावर जिल्हाधिकारी नेमला, तसाच न्यायाधीशही नेमला. नवीन न्यायव्यवस्था निर्माण केली. कायद्यापुढे सारे समान झाले. सामान्य माणसाला न्याय मिळू लागला. टपाल खात्याच्या निर्मितीमुळे सामान्य माणसाचीही डाक इकडून तिकडे जाऊ लागली. लष्कराच्या हालचालींसीठी का होईना, पण दळणवळणाच्या सोयी निर्माण केल्या. काही भागांत आगगाड्याही सुरु झाल्या. या साऱ्या बदलानं विस्मयचकित झालेला सामान्य माणूस इंग्रजांच्या बुद्धीचं कौतुक करु लागला. गोऱ्या कातडीचं आजही जिथे कौतुक वाटतं तिथे त्याकी किती वाटत असेल त्याची कल्पनाच केलेली बरी.

अशा प्रकारची सामाजिक स्थिती त्या काळी होती. एक वर्ग हतबल होऊन तमोगुणाच्या प्रभावाखाली गेला होता. दुसरा वर्ग पारंपरिक ज्ञानाला पारखा होऊन नव्या ज्ञानाच्या प्रकाशानं स्तिमित झाला होता. आणि तिसरा बहुजनसमाज, मुळातच अज्ञानांधकारात असणारा, गोंधळून जाऊन निद्रितावस्थेत गेला होता.

अशा या समाजाला प्रथम जागृत करण्यात आणि नंतर त्यांच्यामध्ये स्वातंत्र्याची तहान निर्माण करण्याचे महान कार्य लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल आणि अरविंद घोष प्रभृतींनी केलं आणि म्हणूनच पंडितजींनी म्हटल्याप्रमाणे महात्माजींना त्यांचं कार्य करणं सुकर झालं.

या चौघांमध्ये, वयानं सर्वांत तरुण असणारे श्रीअरविंद घोष यांनी हे कार्य कसं केलं, कोणकोणत्या मार्गांनी केलं आणि त्यामागील त्यांची प्रेरणा कोणत्या स्वरूपाची होती याचा आपण आढावा घेऊ. श्रीअरविंदांच्या राजकीय सहभागाचे मुख्यतः दोन विभाग पडतात. एक वैचारिक सहभाग - १८९३ पासून १९१० पर्यंत आणि दुसरा प्रत्यक्ष सक्रिय सहभाग १९०५ ते १९१० असा ५ वर्षांचा असला तरी १९०५ पूर्वी काही काळ क्रांतिकारकांशी गुप्त मसलती अथवा मार्गदर्शन सुरू झालं होतं.

वैचारिक सहभागामध्ये त्यांनी एका बाजूने नेमस्त काँग्रेसवर टीकेची झोड उठवून त्यांना कार्यप्रवण करण्याचा प्रयत्न केला तर दुसऱ्या बाजूनं इंग्रज सरकारवर टीकास्त्र सोडून त्यांचे दोष लोकांच्या नजरेस आणले. परंतु ही टीकास्त्रे सोडत असतानाच त्यांनी राष्ट्र आणि राष्ट्रवादावरचे आपले विचार लोकांसमोर ठेवले.

## नेमस्त कॉंग्रेस

भारतात आल्यावर श्रीअरविंदांनी सामाजिक स्थितीचे अवलोकन केले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकांना संघटित करण्याची गरज होती. सुदैवानं अशा प्रकारची देशव्यापी संघटना १८८५ मध्ये 'राष्ट्रीय सभा' अथवा 'कॉंग्रेस' या नावानं अस्तित्वांत आली होती. देशाच्या सर्व भागांतील अनेक थोर व्यक्ती या संघटनेच्या नेतेपदी होत्या. पण ही सर्व मंडळी नेमस्त विचारसरणीची होती. संपूर्ण स्वातंत्र्य अथाव स्वराज्य हा विचारही या मंडळीना मानवत नव्हता. काही छोट्या मोट्या सवलती प्राप्त करण्यासाठी प्रथम अर्ज करणं. नंतर विनंत्या करत बसणं, सवलत मिळाली तर मायबाप सरकारला धन्यवाद देण आणि नाही मिळाली तर सौम्य शब्दांत खेद व्यक्त करणन यापलीकडे राष्ट्रीय सभेच कार्य जात नव्हतं. जवळ जवळ १९०३ च्या अधिवेशनापर्यंत अध्यक्षीय भाषणाचा सूर ''इंग्रजी साम्राज्यांतर्गत वसाहतींचं सरकार'' मागणं हाच होता.

श्री.अरविंदांच्या मनानं तर प्रथमपासूनच संपूर्ण स्वातंत्र्याचा ध्यास घेतला होता. आणि विशेष म्हणजे ते प्राप्त करण्यासाठी त्यांना कोणाची मेहेरबानी नको होती. त्यांचा स्वसामर्थ्यावर विश्वास होता. त्या काळच्या नेमस्त पुढाऱ्यांची त्यांच्याशी तुलना करताना सुभाषचंद्र बोस म्हणाले,''he was a fearless advocate of independance at time when most of the leaders with their tongues in their cheeks, would talk only of colonial self-government.'' अशा या नेमस्त आणि नेभळट विचारांची श्री अरविंदांना मनस्वी चीड होती. ही चीड व्यक्त करून कॉंग्रेसच्या मवाळ नेतृत्वावर हल्ला चढविण्याची संधीही त्यांना लवकरच मिळाली. श्रीअरविंदांचे केंब्रिजपासूनचे मित्र केशरराव देशपांडे मुंबईत 'इंदुप्रकाश' या पाक्षिकाचं संपादन करत होते. त्यांच्या विनंतीवरून श्री अरविंदांनी ''New lamp for old'' या मथळ्याखाली एक लेखमाला सुरु केली. यातील पहिल्या दोन लेखांनी राजकीय वर्तुळांत प्रचंड खळबळ उडाली. ''अशाप्रकारचे लेख चालू राहिले तर तुमच्यावर राजद्रोहाचा खटला भरला जाईल, असा इशारा न्यायमूर्ती रानडे यांनी इंदुप्रकाशच्या मालकांना दिला. तेव्हा त्यांनी देशपांड्याच्या मार्फत अरविंदांना जहरी टीका आवरती घेण्यास सांगितले. ही संपूर्ण लेखमाला लिहून झाल्यावर अरविंदांची न्यायमूर्तींशी भेट झाली. त्यावेळी झालेल्या चर्चेत न्यायमूर्तीनी अरविंदाना असा सल्ला दिला की कॉंग्रेसवर टीका करण्याऐवजी त्यांनी ब्रिटीशांच्या तुरुंगातील परिस्थिती सुधारण्यावर लक्ष्य केंद्रित करावे. त्यावेळच्या नेमस्त पुढाऱ्यांची मानसिकता आणि विचारसरणी कशी होती त्याचे हे मासलेवाईक उदाहरण.

या लेखात एकवीस वर्षाच्या तरुण अरविंदांचे आपणास अद्‌भुत दर्शन होते. त्यांचे सूक्ष्म विचार सामर्थ्य परिस्थितीचे सर्वांगीण, सर्वग्राही, आश्चर्यकारक आकलन, भाषेवरील प्रभुत्व, त्यांची नितांत कळकळ, ज्वलंत देशभक्ती धैर्य आणि निःसीम निःस्वार्थ आपल्या दृष्टीस पडतो. यानंतरच्या लेखात अरविंदांनी राजकारणांतील तात्विक मुद्यांवर चर्चा करून सरळ हल्ल्याची तीव्रता नाईलाजाने कमी केली. पण याचवेळी त्यांनी आणखी एक मुद्दा पुढे ठेवलाय, उच्चवर्णीय सुशिक्षित श्रीमंत वर्गामध्येच मर्यादित झालेले कॉंग्रेसचे कार्यक्षेत्र विस्तृत होणे आवश्यक होते. मध्यमवर्ग व सर्वसामान्य जनता यांचा सहभाग झाल्याशिवाय कॉंग्रेसला खरे सामर्थ्य प्राप्त होणार नाही असा विचार त्यांनी हिरिरीने मांडला.

## इंग्रजांवरील टीका

एका बाजूने कॉंग्रस संघटनेवर प्रहार करून तिला कार्यश्रवण करण्याचा प्रयत्न ते करत होते तर दुसऱ्या बाजूने निर्भीडपणे ते ब्रिटिश राज्यसत्तेवर प्रहार करत होते. ब्रिटिशांच्या विरोधात लिहिलेल्या लिखाणांत तीन प्रमुख

मुद्यांचा समावेश होता.

पहिला मुद्दा असा की ब्रिटिश राजसत्तेच्या प्रभावामुळे आणि त्यांच्या विशिष्ट राजनीतीमुळे आपले भारतीयत्व नष्ट होण्याचा धोका होता.

दुसरा मुद्दा असा की परकीय सत्ता आणि त्यांची राजनीती भारतीयांना पंगुवत बनवत होती. कारण माणूस जेव्हा आपल्या उत्कर्षासाठी, प्रगतीसाठी स्वसामर्थ्याऐवजी परकीय सत्तेच्या मेहेरबानीवर अवलंबून राहू लागतो, तेव्हा त्याची मानसिकता खची होऊन तो पंगू होतो.

आणि तिसरा व महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, ब्रिटिश राज्यकर्त्यांनी चालविलेले भारताचे आर्थिक शोषण इंग्रजांनी प्रथम आमची स्वयंपूर्ण अशी ग्रामव्यवस्था उध्वस्त केली. रोजगारीचे स्थानिक व्यवसाय नष्ट केले आणि मग स्वतःची हक्काची बाजारपेठ इथं निर्माण करून, आर्थिक शोषण सुरू केलं.

## भारतीयत्वाचं जागरण

इंग्रज भारतांत येण्याआधीपासूनच भारतीय संस्कृती आणि हिंदु धर्मांच्या बाह्य आचार-विचारांत भोंगळपणा शिरला होता. इंग्रजांनी १८३५ सालापासूनच इंग्रजी शिक्षण देण्यात सुरुवात केली मग ते ''वाघिणीचे दूध'' पिऊन सशक्त झालेला आणि इंग्रजी विचारांची हळद पिऊन गोरं होऊ पाहणारा नवशिक्षितांचा वर्ग इंग्रजांच्या संस्कृतीकडे आणि त्यांच्या धर्माकडे आकर्षित होऊ लागला होता. अशा या समाजाला अरविंदांनी आपल्या गतवैभवाची प्रथम आठवण करून दिली आणि त्यांचे भारतीयत्व जागृत करून त्यांना राष्ट्रभक्तीकडे वळवलं. त्यांच्या प्रभावी विचारांची दिशी कोणती होती त्याकडे एक नजर टाकू. ''या देशाचे श्रेष्ठत्व आणि विचारवैभव जगात प्रस्थापित करण्याची आकांक्षाच समाजात प्रचंड पराक्रम करण्याची ईर्षा निर्माण करू शकेल. फक्त लाभासाठींच आम्ही तुम्हाला उद्युक्त करू इच्छित नाही. आपण एक थोर व वैभवशाली राष्ट्र होतो याची आपणास प्रथम जाणीव झाली पाहिजे. आणि याबद्दल आपल्या स्वाभिमानशून्य व शरणागत वृत्तींचा लाभ उठवूनच अन्य राष्ट्रांनी आपणाला विनाशाच्या गर्तेत फेकून दिलं आहे. केवळ भौतिकतेच्या आकांक्षा राष्ट्रनिर्मितीचे काम कधीच करू शकणार नाहीत. पण जेव्हा राष्ट्रीय स्वाभिमान जागृत होतो, तेव्हाच अधःपतित व विस्कळीत राष्ट्र पुन्हा एकजीव होते. त्यांत कल्पनातीत शक्तीची उर्जा निर्माण होते.''

स्वातंत्र्यलढ्याच्या उत्तरार्धात सारा देश कसा एकजीव झाला होता आणि केवढी प्रचंड उर्जा निर्माण झाली होती ते आपणास ठाऊकच आहे. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केवळ भौतिक समृद्धीच्या आकांक्षानाच खत पाणी मिळून निर्माण झालेल्या हीन राजकारणामुळे त्या एकजीवतेला दुर्दैवानं तडे पडू लागले आहेत. आणि त्या शक्तीचा उपयोग अनाठायी होत आहे.

## आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः ।

वस्तुतः श्री अरविंदांनाही वरील भोंगळपणा नामंजूर होता. पण या बाह्य भोंगळपणाच्या अंतरंगात आमच्या ऋषी-मुनींना जाणवलेली आणि त्यांनी प्रस्थापित केलेली सर्वश्रेष्ठ सत्यं दडली आहेत, हेही त्यांना स्पष्ट दिसत होतं. आणि म्हणूनच वयाच्या ७० व्या वर्षापासून २१व्या वर्षापर्यंत इंग्लंडमध्ये राहून, पाश्चिमात्य पद्धतींचं शिक्षण घेऊनही ते हुरळून गेले नाहीत. मात्र याचा अर्थ त्यांना आधुनिकतेचं वावडं होतं असाही घेता नये. आपण २०व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे आहोत याची त्यांना जाणीव होती. ''आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः। या आर्योक्तीप्रमाणे साऱ्या विश्वातून आमच्याकडे उत्तम विचार येवोत अशीच त्यांची धारणा होती. मात्र या नवविचारांच्या सहाय्याने उभारली जाणारी आधुनिकतेची इमारत भारतीयत्वातील मूलभूत विचारांच्या पायावरच उभारायला

हवी, असं ते म्हणत असत.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या थोर तत्त्वांची पाश्चिमात्य जगाला मिळालेली देणगी फ्रेन्चांकडूनच होती याचे त्यांनी स्मरण करून दिले. इंग्रजांच आपल्यावर राज्य आलं, आपला त्यांच्याशी संबंध आला, म्हणून जे जे इंग्रजांचे ते ते उत्तम असं मानण्याचं कारण नाही असं स्पष्ट प्रतिपादन करून इंग्रजाच्या कार्यप्रणालीमधील उणिवा त्यांनी लोकांसमोर मांडल्या.

साहेबी उद्दामपणाचा उपहास

भारतात येणारे इंग्रज अधिकारी भारतीयांशी उर्मटपणे वागत. एतद्देशीयांना ते कस्पटासमान लेखत. त्यांच्या अशा वागणुकीचा अरविंदांनी स्पष्ट शब्दांत निशेध केला. काही अपवाद वगळता इथे येणारे अधिकारी हे दुय्यम व तृतीय दर्जाचेही असत. मुळात कनिष्ठ पातळीवर असणाऱ्या माणसाला वरिष्ठ पातळीचा अधिकार प्राप्त होतो तेव्हा त्याच्याकडून चांगल्या वागणूकीची अपेक्षा कशी करणार, असा उपहास करून श्रीअरविंद म्हणतात- ''They are really ordianry men and not only ordinary men but ordinary Englishmen- types of the middle class or Philistines, in the graphic / English phrase, with the narrow hearts and commercial habit of mind.''

अशा प्रकारच्या बेधडक परंतु विशिष्ट पातळी राखून केलेल्या टीकेच्या योग्य तो परिणाम होऊ लागला. इंग्रजांना देव मानणारा समाज हळूहळू ताळ्यावर आला. इंग्रचांच सत्यस्वरुप उघड होऊ लागलं. स्वातंत्र्याची तहान निर्माण होऊन साऱ्या देशांत राष्ट्रभक्तींच वारं संचारू लागलं.

अशा रीतीनं एका बाजूला कॉंग्रेस पक्षाच्या मवाळ पंथीयांवर तर दुसऱ्या बाजूला इंग्रज राज्यकर्त्यांवर कोणत्या पद्धतीनं श्री अरविंद हल्ला चढवत होते ते आपण पाहिलं. आता या स्वातंत्र्य लढ्यामागील त्यांची भूमिका काय होती, भारतमातेला दास्यत्वातून मुक्त करून त्यांना काय साधायचं होतं. राष्ट्रीयत्व व राष्ट्रप्रेम यावरील त्यांच्या विचारांमधील प्रेरणा कोणती होती त्याकडे आपण नजर टाकू.

राष्ट्र म्हणजे काय?

श्रीअरविंदांची आध्यात्मिक राष्ट्रवादाविषयी काय कल्पना होती ते जाणून घेण्यासाठी प्रथम त्यांच्या दृष्टीकोनातून राष्ट्र म्हणजे काय ते पाहू. श्रीअरविंद म्हणतात,'राष्ट्र म्हणजे केवळ जमिनीचा एखादा तुकडा नव्हे, नद्या डोंगर इत्यादींना सामावणारा अथवा एखाद्या समुद्रानं सीमित केलेला भौगोलिक प्रदेश नव्हे, अथवा केवळ असंख्य मानवांचा समूह नव्हे. राष्ट्र ही एक महान शक्ती असते. कोट्यावधी मानवांच्या एकत्रित शक्तीतून निर्माण होणारी एक महानशक्ती. ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला आत्मा असतो एक स्वभावधर्म असतो, स्वतःच्या प्रगतीची एक संकल्पना असते, त्याचप्रमाणे प्रत्येक राष्ट्रालाही स्वतःचा आत्मा असतो, स्वतःचा स्वभाव धर्म असतो.' श्रीअरविंद म्हणतात,''The nation, like the individual has a body, an organic life, a moral and aesthetic tempartament, a developing mind and a soul behind all these signs and powers for the sake of which they exist.''

आपल्या आत्म्याच्या पाठीमागे, आत्मा ज्याचा अंश असतो, तो परमात्मा उभा असतो, त्याचप्रमाणे राष्ट्राच्या आत्म्याच्या पाठीमागे त्याची देवता, उभी असते.

बंकिमबाबू आणि वंदे मातरम्

१८८३ साली बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेल्या आनंदमठ या कांदबरीतील ''वंदे मातरम'' या गीतामध्ये श्रीअरविंदांना या देवतेचं भारतमातेचं प्रथम दर्शन झालं. वंदे मातरम् या गीतातील मातेच्या स्तुतीनं आणि त्यातील मंत्र सामर्थ्यानं श्रीअरविंद भारून गेले. भारतमातेला स्वतंत्र

करण्याची जी इच्छा सुप्त रुपानं त्यांच्या हृदयात होती ती जागृत झाली. तिनं एक महान, दैवी, सामर्थ्यशाली रूप धारण केलं. श्रीअरविंदांच्या लेखणीतून, मुखातून तीच प्रेरकशक्ती शब्दरुपानं बाहेर पडू लागली. तिनं भारतातील साऱ्या तरुणांच्या हृदयाचा ठाव घेतला.

श्री अरविंद, बंकिमबाबूंचा उल्लेख नेहमी ऋषी म्हणून करत असत. ऋषी हा द्रष्टा असतो. एखाद्या महान मंत्राचं त्याला प्रत्यक्ष दर्शन घडतं. त्या मंत्रानं तो स्वतः भारून जातो आणि जेव्हा तो समाजाला तो मंत्र देतो तेव्हा सारा समाजही त्याने भारला जातो. वंदे मातरम् या दोन शब्दांनी ही किमया केली. अनेक स्वातंत्र्यवीरांनी वंदे मातरम् चा घोष करत बंदुकीच्या गोळ्या छातीवर झेलल्या; तर अनेक क्रांतीवीर वंदे मातरम् म्हणत हसत हसत फासावर गेले. एक द्रष्ट्या ऋषीनं निर्मिलेला मंत्र, दुसऱ्या महान ऋषीनं जाणला आणि त्या मंत्राच्या प्रभावावरच पुढे आपला स्वातंत्र्यलढा उभा राहिला.

## आध्यात्मिक राष्ट्रवाद

आता राष्ट्र म्हणजे केवळ जमिनीचा तुकडा नव्हे, ती तर प्रत्यक्ष आपली माता आहे; या कल्पनेचा स्वीकार केल्यावर मग प्रश्न निर्माण होतो की अशी ही माता जर परकीयांच्या दास्यत्वांत अडकली असेल, परकीयांनी तिच्या हातापायांत बेड्या घालून तिला बांधून ठेवलं असेल, तर तिच्या मुलांनी काय करावं? परकीयांची भाषा व संस्कृती यांचा स्वीकार करून त्यांची चाकरी करत, अथवा खुशामत करत ते आपल्या मातेला कधीतरी मुक्त करतील अशा आशेवर स्वस्थ बसणं कितपत योग्य ठरेल? श्रीअरविंद म्हणतात, अशा प्रसंगी मिळेल ते साधन वापरून आणि जमेल त्यामार्गानं मातेला मुक्त करणं हे तिच्या प्रत्येक मुलाचं आद्य कर्तव्य आहे. भारतमातेला स्वतंत्र करण्याचा लढा हा एक यज्ञ आहे. या यज्ञामध्ये आहुती द्यायची ती आपल्या सर्वस्वाची आणि ती तशी द्यायला आपण जेव्हा सिद्ध होतो तेव्हाच ती माता आपल्यावर प्रसन्न होते, आपणाला अलौकिक सामर्थ्य प्रदान करते; असं ते ठासून सांगत.

भौगोलिक एकसंधता, समान भूतकाळ आणि सर्वांना एकत्र बांधू शकणारे समान हितसंबंध आणि काही अंशी अनुकूल राजकीय परिस्थिती या सर्वांच्या प्रक्रियेतून एक स्वतंत्र व सुसंघटित राज्य निर्माण करण्याची प्रेरणा निर्माण होते. अशा राज्याच्या अभिव्यक्तीतून राष्ट्रीयत्वाची संकल्पना मूळ धरते. समान सामूहिक उर्जा व समान हितसंबंध या दोन गोष्टी जेव्हा एकजीव होतात तेव्हा एकात्मतेची भावना निर्माण होऊन राष्ट्रीयत्व दृढमूल होते. असे प्रतिपादन करून श्री अरविंद म्हणतात, "राष्ट्रवाद म्हणजे काय? तो काही एखादा राजकीय कार्यक्रम नाही. राष्ट्रवाद हा धर्म आहे आणि तो प्रत्यक्ष परमेश्वराकडून आलेला आहे. त्यामुळे तो कधीही नष्ट होणार नाही. अशा प्रकारच्या राष्ट्रकार्य म्हणजे धर्मकार्य आहे अशा भावनेनं तुम्हाला कार्य करावं लागेल. हे परमेश्वरी कार्य आहे आणि या महान कार्यात तुम्ही एक साधन आहात हे विसरू नका."

अशा पद्धतींनी श्रीअरविंदानी आध्यात्मिक राष्ट्रवादाचा एक नवा विचारप्रवाह निर्माण केला. पण श्री अरविंदांची आध्यात्मिकता म्हणजे संकूचित धार्मिकता नव्हे. तसेच त्यांच्या आध्यात्मिक राष्ट्रवादाचं उद्दिष्ट संकुचित तत्त्वांवर आधारलेलं धर्माधिष्ठित राज्य निर्माण करणं हेही नव्हतं. श्रीअरविंदांचा राष्ट्रवाद देशांत राष्ट्राभिमान निर्माण करत होता पण त्याची परिणती आक्रमक राष्ट्रवादाकडे झुकणारी नव्हती. मरगळलेल्या अधःपतित समाजाला पुन्हा शक्तिशाली बनवण्यासाठी त्यांनी आपल्या गतवैभवाची आणि प्राचीन थोर परंपरांची, ज्ञानाची विद्वतेची आठवण करून दिली पण याचा अर्थ त्यांना आधुनिक विचारांचे वावडं होतं असा नव्हे. त्यांना केवळ प्राचीनत्वाचं पुनरूज्जीवन करावंच होतं असाही नव्हे आणि म्हणून एका

भाषणांत ते म्हणतात, "Swaraj is the fulfilment of the ancient Life of India under Modern Conditions."

**भारत जगाचा आध्यात्मिक गुरू**

प्रत्येक मानवाला स्वतःचा एक स्वभावधर्म सतो. एखादा क्षात्रवृत्तीचा असतो, एखादा वैश्यवृत्तीचा असतो, एखादा कलोपासक असतोतर एखादा ज्ञानार्जन करून ज्ञानदानाचं कार्य करत असतो. त्याप्रमाणे श्रीअरविंद म्हणतात की प्रत्येक राष्ट्राचाही विशिष्ट असा स्वभावधर्म असतो आणि भारताचा स्वभावधर्म हा जगाचा आध्यात्मिक गुरू होणं हा आहे. हजारो वर्षापूर्वींच्या ऋषीमुनींच्या काळापासून आजतागायत शेकडो महंतांनी योग्यांनी या पावनभूमीत जन्म घेतला. निरनिराळ्या मार्गांनी, निरनिराळ्या पद्धतींनी ईश्वराकडे जाण्याचं देशवासीयांना मार्गदर्शन केलं. इथं जशी श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिकता आढळते, तशी इतरत्र कोठेही आढळणार नाही. कारण प्राचीन काळापासून या देशांत जसा सप्तनद्यांचा प्रवाह वाहतो आहे तसाच आध्यात्मिक ज्ञानाचा स्त्रोतही वाहतो आहे. आणि म्हणून आध्यात्मिक ज्ञानाचा प्रकाश साऱ्या मानवजातीला दाखवणं हे भारताचं ईश्वरदत्त कार्य आहे असं श्रीअरविंद प्रतिपादन करतात व पुढे म्हणतात की यासाठीच भारतानं प्रथम स्वतंत्र व्हायला हवं, सामर्थ्यवानं व्हायला हवं, बलशाली व्हायला हवं.

श्रीअरविंदांचा आध्यात्मिक राष्ट्रवाद हा असा प्राचीन ऋषी मुनींच्या परंपरेतून आलेला, आणि त्याच विचारधारेवर आधारलेला होता. साऱ्या विश्वाची काळजी वाहणारा होता आणि साऱ्या मानवजातीला तिच्या उद्धारासाठी मार्गदर्शन करण्याची इच्छा बाळगणारा होता. उत्तरपारा येथे केलेल्या सुप्रसिद्ध भाषणात श्रीअरविंद म्हणतात, "इतर राष्ट्रांप्रमाणे स्वतःच्या भरभराटीकरता अथवा स्वतः सामर्थ्यवान झाल्यावर दुर्बलाना चिरडण्याकरता भारताचा अभ्युदय होत नाही. जे शाश्वत ज्ञान त्याच्या स्वाधीन केले आहे ते सर्व जगाला देण्यासाठी भारताचा उदय होत आहे. भारताचे जीवित साऱ्या मानवजातीच्या कल्याणासाठी आहे, स्वतः करता नव्हे"

श्रीअरविंदांनी जे अशा प्रकारचा अत्यंत उच्च आदर्शवाद जेव्हा समाजासमोर ठेवला तेव्हा नेमस्तांच्या काही किरकोळ सुधारणांच्या मागण्या त्यासमोर फिक्क्या पडू लागल्या. सारा समाज हळूहळू प्रखर राष्ट्रवादाकडे आकर्षित होऊ लागला.

श्रीअरविंदाची वैचारिक दिशा, त्यांचे राष्ट्रप्रेम आणि त्यांच्या आध्यात्मिक राष्ट्रवादाची बैठक आपण जाणून घेतली. त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील प्रत्यक्ष सहभागाकडे आपण पुढील भागात नजर टाकू

**श्री. नरेन्द्र नाडकर्णी**

सीडी - १०१, सी -१

श्रीरंग सोसायटी, ठाणे

टे. न. २५३३३१६०

E.mail : nd_nadkarni@yahoo.com

प्रकाशनास होत असलेल्या विलंबाबद्दल दिलगीर आहोत -

- संपादक

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*मूर्ती, प्रतिमा प्रतीके यांचा मानवी संस्कृतीवर खोलवर परिणाम झाला आहे. त्यामागील सामाजिक मानसिकता व त्या अनुषंगाने केलेले हे चिंतन.* - संपादक

'दिशा' च्यामागील अंकात माननीय वसुंधरा राजे, राजस्थान सरकारच्या मुख्य प्रधान, यांचे 'अन्नपूर्णा देवी' च्या स्वरुपात चितारलेले एक पोस्टरचे बॅनर छापले होते.

टाईम्स ऑफ इंडियाच्या ता. २२-६-२००७ च्या मुंबई आवृत्तीत पान क्रमांक १५ वर 'सोनिया गांधी' माननीय कॉंग्रेस अध्यक्षा व लोकसभा सदस्या यांचाही फोटो - 'दूर्गा देवी' ह्या हिंदू देवतेच्या स्वरुपांत छापला आहे.



सोनिया गांधी-दूर्गादेवी स्वरूपात

चित्र नं. १

मुरादाबाद, यु.पी. प्रांतातील डिस्ट्रिक्ट कॉंग्रेस प्रेसिडेंट श्री. ए. एस् सोनी यांनी हे 'Work of Art' म्हणजे एक कलात्मक निर्मिती म्हणून कॉंग्रेस पार्टी ऑफीसवरच्या भितीवर लावले.

पण, कॉंग्रेसचेच एक निवृत्त मेंबर ऑफ पार्लमेंट श्री. हफीज सिद्दिकी यांनी ही कृती पसंत पडली नाही.

कारण :-

कॉंग्रेस पक्ष 'निधर्मी (Secular)' आहे. पण, शहर कॉंग्रेस अध्यक्ष असद मौलनी यांचा असा आक्षेप आहे की "कॉंग्रेसच्या पुढारी नेत्या सोनिया हिंदू देवतेच्या स्वरुपात दाखविणे हे आक्षेपार्ह किंवा निषेधार्ह आहे.

पण, सोनिया गांधीना, जी वृत्ती केवळ आपला नितांत आदर व्यक्त करण्यासाठी, किंवा निव्वळ कुणाचा तरी लांगुलचालनात्मक स्तुतीचा प्रयोग वाटावा, त्या वर आधारून श्री. सोनी ह्या कॉंग्रेस डिस्ट्रिक्ट प्रेसिडेंटला, त्यांनी सस्पेंड केले. आता, त्यांचा पक्ष पूर्ण चौकशी करुन नंतर दोषी माणसांना कॉंग्रेस पक्षातून काढून टाकणार आहे.



'पंचमुखी नेतृत्व'

चित्र नं. २

दुसरा फोटो जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी, राजीव

गांधी व सोनिया गांधी दाखवतो. हा घराण्याचा फोटो असेल तर महात्मा गांधींचा चेहरा हा फक्त 'ब्रँड नेम'समजावयाचा नाही का?

<u>प्रश्न राजकीय दृष्टीने पाहिला जातो आहे, हे उघड आहे.</u>

पण, ह्या निरनिराळ्या भावना का पैदा होतात? प्रधान भावना 'राजकीय का पैदा होते?

थोडक्यात म्हणजे ह्या 'चित्रांच्याकडे' कोणत्या मानसिक भूमिका किंवा मते, 'चिकटली' आहेत?

१) एक तर ती वैयक्तिक सांस्कृतिक, राजकीय प्रकारची आहेत. किंवा,

२) त्या चित्राकडे निव्वळ 'कलाकृती' म्हणून बघणे अशक्य दिसते आहे. कां बरे!

३) ह्या चित्रात 'एक इटालियन स्त्री', 'हिंदू देवतेच्या' स्वरुपात काही मुस्लिम बघू शकत नाहीत कां?

४) 'Secular' निधर्मी असा जो काँग्रेस पक्षाच्या 'सध्याच्या' मानलेल्या तत्त्वज्ञानाचा भाग आहे, त्याला ही चित्रकृती सुसंगत नाही कां बरे?

५) ह्या चित्राच्या प्रदर्शनामुळे 'जनमतावर' जो अनधिकृत प्रभाव पडेल, तो पक्षाला 'सध्यातरी' अमान्य आहे, असे दिसते.

(हा लेख लिहीताना आणखी एक चित्र गोंधळ माजवतो आहे. ह्यात सोनिया गांधी या 'राणी लक्ष्मीबाई' या स्वरुपात आहेत.)

<u>चित्राचा मनावर प्रभाव</u>

पण, केवळ एक चित्र म्हणजे एक जड वस्तू म्हणजे 'चैतन्यरहित' वस्तू!! ही मानवी मनावर व समाज मनावर असे निरनिराळे आघात कसे करू शकते? चित्र व त्याची मानवी मानसिकतेच्या विशिष्ट भूमिकेची. स्पंद निर्माण

**After goddess, Congman shows Sonia as Laxmibai**



**A poster potering Sonia as Rani Laxmibai shows i the office of ex-Cong. MLA Kailash Sankar in MP.**

चित्र नं. ३

करण्याची शक्ती - ही अदृश्य शक्ती कुठल्या नैसर्गिक शक्ती वाहकामुळे होते?

आपल्याला ह्या शेवटचा प्रश्न जास्त महत्त्वाचा वाटावा अशी अपेक्षा आहे नाही का? त्याचे शास्त्रीय उत्तर काय?

**फ्री मॅसन व सिंबॉलिझम**

'Free Masonory' फ्री मेसनरी हा, एक प्रचलीत जीवनातील आंतरराष्ट्रीय पातळीवरचा 'संप्रदाय' आहे. त्याच संप्रदायाचे एक अनुयायी Pro. Nicola काय लिहीतात, ते वाचा :-

<u>THE SYMBOL</u>

In ancient Greek language the world was under lining a way to control or a way of recognition, obtained breaking an object into two irregular halves, in such a way that the owner of one of the two could have been recognised by

putting his half to coincide together with the other one. It is also a thing which represents another one. The Symbol, in fact, hide deeper meaning. The mystic 'ugo di San Vittor' describes Symbols like "the connection of visible things in order to show the invisible ones."

अदृश्य चीजा दृश्य symbol च्या मार्फत जाणून घ्यायाच्या असतात असा हा प्रयोग किंवा उद्योग होय!!

जडवादी जग व समाज हा भाषेतील शब्दांच्या मार्फत संवाद साधत असतो. पण, स्पिरीच्युअल (किंवा धार्मिकही काही, प्रमाणात) व्यक्त व अव्यक्त जगांतील संकल्पनाचा 'एकात्म भाव व ज्ञान' जाणू शकतो. त्यालाच हा लेखक 'A Synthesis grounded on intutive knowledge (pure transcendent intellect) असे संबोधितो.

## अंर्स्ट कॅसियर व Symbol

मागच्या लेखात Ernst Cassier चा उल्लेख केला होता. तो म्हणतो की 'Man is a Symbolic animal' "माणूस हा प्रतीकांचा प्राणी आहे." "The interpretation of the Symbol, then, is down, to the intelligence and sensitivity of each one of us, through an inner quest, which leads us to find, in ourselves, our microcosom." 'त्यामुळे, प्रतीकाचा अर्थ वा बोध प्राप्त करण्याचा प्रयत्न, हा बुद्धी व संवेदनाक्षमता, ह्या दोन गोष्टींवरची जबाबदारी आहे. प्रत्येकाची आहे व ती त्याला स्वतःला 'फॉर्म' (Embodied Consciousness) (बंदिस्त कॉशसनेस) मध्येच स्वतःच्या 'अंतर्जगाचा' शोध लावून देते."

## पाश्चात्या ज्ञानाचा संदर्भ

कोणीही स्वाभाविकपणे असे म्हणेल की मी हे पाश्चात्य संस्कृतीतील विद्वानांची मते व ज्ञान का सांगते आहे.!!

त्याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे त्यांची (आक्रमकांची) भाषा व विचारपद्धती, ही सध्याच्या भारतीय मनाची सुद्धा 'इतिहासाने घडवलेली' प्रवृत्ती आहे.

## दुर्गम भारतीय ज्ञान

दुसरे कारण हे की भारतीय संस्कृतीत जे 'मूळ ज्ञान' आहे, ते पुष्कळच उंचीचे व 'सत्यज्ञान' आहे पण, त्याची भाषा 'गूढ' आहे. 'आगम, निगम' आहे. शिवाय ती सूत्र पद्धतीत बांधलेली आहे. त्याच्या 'शब्दांकनाला' संहितेला स्वयंभू भाषा क्षमता - संवाद क्षमता नाही. पूर्णबोध, पूर्ण ज्ञान केवळ ह्या 'लिखीत संहितांमार्फत' अशक्य आहे.

त्यामुळे जे प्रयत्न ह्या जड भूमिकेत, अजागृत मानवी बुद्धीला करावे लागतात, ते पुष्कळसे पाश्चात्य संस्कृतीतील प्रयत्नासारखेच असावे लागतात, आणि असतात!! पण, नंतर एक पातळी येते की जेव्हा पुढील प्रगती ही 'समाधीजन्य ज्ञान' Transcendented Knowledge त्याच पद्धतीने होऊ शकते. शिवाय, त्याकरीत लागणारी तंत्र, मंत्र, यंत्र, योग साधना ही सर्व ह्या 'भारत देशातील 'एकाच चितीच्या' मानवाला' 'एकाच भूमी' वरील जीवात्म्याला प्राप्त होऊ शकते. इथे 'भूमी हा योगशास्त्र, अध्यात्मशास्त्रातील शब्द आहे. आठवण करा - भगवद्गीतेतील क्षेत्र, 'भूमी कल्पना'!! 'कुरुक्षेत्री', प्रश्न तयार व्हावा लागतो व 'धर्मक्षेत्री' त्याचे उत्तर मिळते व क्रिया घडावी लागते.

आपल्या 'पाश्चात्य संस्कृतीत तयार झालेल्या ज्ञानाच्या भूमीला ह्या खऱ्या 'विद्येने (अविद्या नव्हे) संस्कारित करावे लागते.

## साक्षात्कारी ज्ञान पद्धती

आता आपण एकदम ही 'Synthesis grounded intutive knowledge (pure transcentdent intellect) ही चीज भारतीय वैदिक व उपनिषदिक ज्ञानात तपासूया -

दिशाच्या मागील अंकात 'तैतरीय उपनिषद ५वा अनुवाद' शिक्षावल्लीचा उल्लेख केला होता.

| Vyahriti | Adhiloka | Adhijautish | Adhividya | Adhyatma |
|---|---|---|---|---|
| Bhuh | Earth | Agni | Rig | Prana |
| Bhuvh | Midspace | Vayu | Yajuh | Apana |
| Svah | Dyau | Aditya | Soma | Vyana |
| Mahah | Aditya | Chandrama | Brahma | Anna |

**५ संहिता तर्क - 5 sets of Transformation**

**चित्र नं.४**

त्यात ५ संहिता तर्क - ५ sets ह्या उपनिषदिक ज्ञानाचा संदर्भ होता त्यांत 'व्याहति', भूः, भूवः स्वः ह्या तीन 'लेव्हलस', किंवा 'स्तर' वा 'पातळी', मानवी फॉर्म - 'रूप', यामध्ये आहेत. त्या काय करतात?

"भूरिति वा अयं लोकः । भूव इत्यन्तरिक्षम् ।
सुवरित्य सौ लोकः । मह इत्या दित्यः ।
आदित्येन वा व सर्वे लोका महीयन्ते ।

ह्याचे श्री. एच्. एन्. रामस्वामी ह्यांचे भाषांतर असे-
Bhur is verily this world (**the Visible Universe**) ।

Bhurah is the internal "Energy World" ।
Surah is the 'Thought World' ।
Maha is the 'Luminous World of Light' ।

For, verily all the world's are manifest in space only by **light** (ज्ञान प्रकाश)

भूः - दृश्य जग

भूवः - शक्ति जग

स्वः - ज्ञान जगत ( वैयक्तिक)


महः - सत्यज्ञान, ब्रह्मज्ञान, विद्या - जग

'विद्या' याचा अर्थ knowledge असा 'आपटे' यांच्या शब्दकोशात आहे. पण, पुढे एक वचन आहे.

" विद्यामभ्यसननेव प्रसादार्यतुमर्हसि ।
विद्या नाम नरस्य रुपमधिकं प्रच्छन्न गुप्तं धनं ।

या मांडणीचा मतीतार्थ हा की मानवाच्या सध्याच्या ज्ञानेंद्रियांची पातळीची क्षमता ही 'पशुतुल्य', म्हणजे पशूला जे ज्ञान प्राप्त होईल एवढीच आहे. दचकू नका किंवा अपमानीतही होऊ नका !!

पशू कोण, तर त्याला जे दिसते तेच खरे, असे वाटते. पण, ह्या दिसणाऱ्या जगाच्या मुळाशी अदृस्य, अव्यक्त असे 'सत्यज्ञान' 'Reality' आहे. ते मिळवण्यासाठी अविद्या (भौतिक ज्ञान) उपयोगी पडत नाही. 'विद्या' हीच फक्त ह्या ज्ञानाला अनुकूलता प्राप्त करून देते.




चित्र नं. ६

**Human Form**
**SPIRITUAL**
**BIOLOGICAL MACHINE**
**चैतन्य यंत्र - जड- चैतन्य**

मग ही 'विद्या' मिळवण्याची यंत्रणा कोणती व कुठे उपलब्ध आहे? तर ती, यंत्रणा 'Structural form' म्हणजे 'रचनाकृती' मध्ये आपल्याच अस्तित्वात, शरीरात, मनात, चैतन्यात, रचलेली, सांठवलेली, ठेवलेली - जन्मतःच अशी प्राप्त आहे. तीन स्तरावर तिची रचना आहे.

वर तैतरीय उपनिषदांत 'शिक्षा वल्लीत'- सांगितल्याप्रमाणे. प्रथम ती 'भूः' स्तरावर सर्वसामान्य इंद्रिय ज्ञानाने Data (phusical) 'भौतिक वस्तू दर्शन' ह्या केवळ ' माहिती स्वरूपांत' प्राप्त होते. नंतर तिचा 'भूवः' म्हणजे 'शक्ती स्वरुपांत' स्थित्यंतर किंवा रुपांतर होते. अर्थातच, ह्या स्थित्यंतराची प्रक्रिया प्रत्येक माणसाच्या नैसर्गिक, योगिक, स्पिरीच्युअल क्षमतेप्रमाणे व स्केलवर व निरनिराळ्या गुणात्मकतेने प्राप्त होते. त्यानंतरची क्रिया ही या मूळ इंद्रियगम्य ज्ञानाची 'Thought form' म्हणजे 'विचार रूप' ह्या स्वरुपांत स्थित्यंतर पावते. हेही काम प्रत्येक माणसाच्या त्याच्या त्याच्या कमावलेल्या क्षमतेबरहुकूम गुणात्मकतेने होते.

म्हणूनच, 'गायत्री मंत्राची' जी दिक्षा व साधना विद्यार्थ्याला 'गुरुकुलांत' दिली जात असे तिचा पूर्ण रोख ही ज्ञानाची पातळी उंचावण्यासाठी 'सूर्य, सविता, आदित्य' यांच्या पासून एक 'शक्ती' प्राप्त करून ह्या 'यांत्रिक योजनेची' गुणवत्ता वाढवण्यासाठी केली जात होती. त्यांतही 'मेधाजनन' ही क्रिया अनुस्यूत होती. ही मेधा शक्ती ही या 'सूर्य, सविता' यापासून प्राप्त होते. काय आहे हा गायत्री मंत्र?

भूः भूवः स्वः । तत्सत् वितुर वरेण्यंत्।
भर्गो देवस्य धीमही धियो योनः प्रचोदयात्।

वेदिक, योगिक, भारतीय शिक्षण पद्धतीतील ही योजना 'मानवी फॉर्मच्या मर्यादांवर' मात करणारी होती व आमच्या ऋषी मुनींना ' देवाने (किंवा निसर्गाने म्हणा हवेतर) दिलेल्या यंत्रणेचे संपूर्ण ज्ञान होते व त्याचा योग्य विनीयोग करण्याची सामाजिक संस्कृती व धारणा होती. आज ती नष्ट करण्यात आली आहे !! दुःखाची, खेदाची बाब आहे.!!

### Symbolic Universe

आता, पुन्हा आपल्या 'Symbol' ह्या विषयाकडे वळू या.

एका अत्यंत मोकळ्या अश्या मनाने व उच्च पातळीवर विचार केला, तर लक्षात येईल की, मानवासमोर जो निसर्ग-प्रकृती पसरलेली व सतत कार्यरत आहे, ती नक्कीच एखाद्या अविनाशी, सतत नित्य नियमांने बांधलेली असावयाला हवी आहे. ह्या नियमांचे रहस्य आपल्याला माहिती नाही. पण त्याचे 'असणे' आवश्यकच आहे. निसर्गात Anarchy अराजक, बेबंदशाही नाही तर Ecological Balance सुद्धा आहे. तसेच ह्या पुढे मांडून ठेवलेल्या दृश्य चित्रांचे, नाटकांचे, व्यवहारांचे आपला 'व्यक्तिगत ज्ञानात' (स्वः) रूपांतर होते, ते ज्या यंत्रणेने आपल्याला शरीरात होते, त्याचे भान मात्र आपल्याला नाही. ते 'आपसूक' होते म्हणून जाणण्या योग्य नव्हे कां? अभ्यासण्या योग्य नाही कां?

भारतीय संस्कृतीत ह्याचा नुसताच शोध घेतला नसून, तशी यंत्रणा समाज शिक्षणांतही 'संबद्ध' व 'बांधून ठेवलेली' होती. आज ती नष्ट करण्यात आली आहे. भगवद्गीतेतील उल्लेखलेली <u>'धर्म ग्लानी'</u> हीच होय !!

पण, ह्या लेखापुरता ह्या विषयाचा संबंध हा की, हे विश्वच एक 'Symbol' बनले आहे. ही 'Symbol' जिवंत, चैतन्यपूर्ण व गतीशील आहे. बोलकी पण आहे.!! जे ब्रह्मज्ञान मिळवायचे योगी, ऋषी, मुनीवर यांचे प्रयत्न चालू आहेत, ते ज्ञान ह्या 'Symbol' च्या , 'प्रतिकांच्या' मागे दडलेले आहे.

उदाहरणार्थ, हापूसच्या आंब्याची 'बाठ वा बीज' जर दिसली, तर तिच्यातंच - जमीन व पाणी, हवा ह्या मदतीने एका आम्रवृक्षांत व हापूस आंब्याच्या स्वरुपात वृद्धी होते. ह्या 'रुपांतर प्राप्तीचा' 'गूढ प्रोग्रॅम' त्या

बीजातच रचलेला आहे. फळ हे त्या प्रॉग्रॅमचे केवळ एक श्रेष्ठ फलित आहे. कारण त्यांतही नवीन बीज आहे !!

शिवाय हा 'प्रॉग्रॅम' अनंत काळ टिकणारा आहे. हे 'ज्ञान' ह्या 'symbol' मुळे 'Gestalt' पद्धतीने, (Gestalt ह्या अर्थाकरिता मागील दिशाचा अंक वाचा), आपल्याला प्राप्त होऊ शकतो.

मग, ह्या अदृश्य, गूढ ज्ञानाच्या प्राप्तीसाठी 'Symbol' चा उपयोग आहे तर !!

वेद व प्रतीक भाषा

वेद व प्रतीक भाषा ह्यांचे काय संबंध व नाते आहे? शिवाय 'वेदांच्या अभ्यास' हा गूढ ज्ञानाला का आवश्यक आहे? हे प्रश्न मला पडले होते व अनेकांना पडणारच!!

ह्याचे अत्यंत समर्पक उत्तर 'Vedic Epistemology' ह्यामध्ये आहे. वेदांची ज्ञानपद्धती ही आपल्याला माहीत असलेल्या मॉर्डन शिक्षणपद्धतीत बिलकूल सामावलेली नाही व ती अत्यंत वेगळी, मूलगामी अर्थाने निराळी आहे. शिवाय, तीच फक्त आपल्या जीवन विषयक 'सनातन व न उकलणाऱ्या प्रश्नांची' उत्तरे देऊ शकते, असा विश्वास भारतीय संस्कृतीत आहे व तसा तो माझाही, आज तरी बनला आहे.

दुसरे उत्तर - म्हणजे माझ्या अवलोकनांत आलेले व मला पटणारे हे स्वामी सत्यप्रकाश सरस्वती म्हणजे कै. डॉ. सत्यप्रकाश, डॉक्टरेट इन सायन्स, अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे, केमिस्ट्री डिपार्टमेंटचे प्रिन्सीपॉल यांच्याकडून मिळाले - त्यांच्या साऊथ आफ्रिकामध्ये दिलेल्या एका भाषणातून !! डॉ. सत्यप्रकाश हे स्वामी दयानंद सरस्वती (आर्य समाज) यांचे अनुयायी व त्यांचे दयानंदाच्या फिलॉसॉफीवरचे भाष्य उत्कृष्ट आहे.

डॉ. सत्यप्रकाश यांच्या व्याख्यानाचा विषय होता 'वेदिक टेक्स्ट "Vedic Text-Divine text"

त्यांच्या म्हणण्याचा आशय हा होती की, 'मानवाच्या फॉर्म' हा ह्या पृथ्वीवर जेव्हा प्रथमच जन्माला आला. तेव्हां त्याला 'ज्ञानाची कोणतीही पूर्व पिठीका वा सामुग्री नव्हती. मग, त्याने या पृथ्वीवरच आपल्या ज्ञानाची सुरवात केली. त्यानंतर भविष्यात युगाने युगे, पिढ्या नि पिढ्या ह्या ज्ञानाची सर्वांगीण वृद्धी होऊ लागली. हा 'ज्ञानाच्या संचय सांठ्याचा' प्रवास सुद्धा आश्चर्यजनक आहे व त्याचेही 'बीज' त्याच्या जन्माबरोबरच 'जन्म-पुनर्जन्म' व व्यष्टी-समष्टि ह्यांच्या 'Relay Race Baton' 'रिले रेसमधील दांडी' सारखे संक्रमीत व प्रगत होत गेले.

पण, त्याला जन्म, मृत्यू, सुख, दुःख, स्वतःच्या अस्तित्वाची वैश्विक सत्यता(CosmicReality) व ह्या अशा अनेक ज्ञानाबद्दल केवळ 'इंद्रियगम्य' ज्ञानाने म्हणजे त्यांच्या 'भौतिक गुणाबरोबर' काहीही गूढ उकलू शकले नाही. हे असे, आजपर्यंत असेच गूढ आहे !!

पण, त्याहीपेक्षा महत्त्वाचे 'ज्ञानाचा पहिला धडा' - "First Cause of knowledge" - हा या 'मानवाला वेद' ह्या 'चीजेपासूनच' मिळाला. मी 'वेद' ही 'चीज' का म्हणतो? कारण आज जी वेदसंहिता ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद व सामवेद अशी Textual शब्दरुपांत आपल्याला मिळाली आहे, अशी ह्या आदिमानवाला मिळाली नव्हती - नसणारच ! ती दिव्य अनुभूतीने, दिव्य प्रकाशाने, दिव्य साक्षात्काराने, काही अथक प्रयत्न करणाऱ्या मानवाला म्हणजेच - ऋषींना प्राप्त झाली. म्हणून हे ज्ञान - वेद - 'अपोरुषेय' आहे हे केवळ 'अनुभूतीजन्य' वा 'समाधीजन्य' ज्ञान आहे.

ही ज्ञानाची पद्धती कशी होती, याचे यथातथ्य ज्ञान कोणी देत नाही. ज्याला मॉर्डन सायन्सचा विद्यार्थी Mystic 'आगम-निगम' म्हणेल व म्हणूनच विश्वासार्ह मानणार नाही. ती अवस्था जवळजवळ सर्व भारतीयांची पण झाली आहे. हीच ग्लानी आहे !! त्यामुळे, सध्या प्राप्त असलेल्या 'शब्द संहिता' (Textual Knowledge) लिखीत स्वरुपांतील' ज्ञानरुप हे दुय्यम दर्जाचे मानावे लागेल. त्याच्या अर्थ लावण्याच्या पद्धतीतील ऐतिहासिक गंभीर

चुका जशा मॅक्समुल्लर, विल्सन वगैरे पाश्चात्य पंडितांनी केल्या तश्याच काही कर्मकांडी व रिच्युअल पद्धती चितारणाऱ्या भारतीय पंडितांनीही केल्या. वेदांचे गूढ, आध्यात्मिक, स्पिरीच्युअल अर्थ लावण्याच्या प्रयत्नात स्वामी दयानंत सरस्वती, महायोगी अरविंद, कपिला शास्त्रीयार यांचे श्रेय मोठे आहे. अरविंदाचे 'Secrets in Vedas' हे पुस्तक ही भारतीय ज्ञान परंपरेला मोठी देणगी आहे!!

तेव्हा ह्या ज्ञानपद्धतीत External Symbols चा प्रयोग का आवश्यक झाला व त्या प्रक्रिया कशा होतात, हा आपला जाणण्याचा प्रयत्न आहे.


<u>प्रतीक व प्रतिमा फरक</u>

प्रथमच प्रतीक व प्रतिमा ह्यातील फरक जाणून घ्यावा लागेल. प्रतिमा म्हणजे चित्ररूप एकच अर्थ निघणारी गोष्ट. पण, प्रतीक म्हणजे symbol म्हणता येईल. ते प्रत्यक्ष वस्तू किंवा प्रसंगापेक्षा अदी निराळे व भिन्न असू शकेल.

उदाहरणार्थ, ३६० व्होल्टची वीज Electric Energy शक्ती ही आपण दोन मानवी अस्थि - हाडे ही क्रॉस किंवा फूली सारखी काढून त्यावर एक मानवी कवटी ही मृत्यूचे लक्षण म्हणून दाखवतो व त्यावर ३६० व्होल्टस् दाब - धोका असे शब्दही लिहीतो.

460 VOLTS

DANGER



ELECTRICCITY SYMBOL
चित्र नं. ५

पण वस्तुतः हे त्या शक्तीचे यथातथ्य चित्र नव्हेच किंवा ही विद्युतशक्ती चित्राच्या स्वरुपात दाखविता येणे अशक्यच आहे.

पण, आपण प्रचारांत आणलेल्या चित्राची सर्व समंतीने एक symbol झाली आहे.

हे आहे एक आलंबन एक प्रतीक व त्याचा अर्थ आपण निरनिराळा काढू शकतो. तरीही आपण त्याचा एकच सर्वसमंत अर्थ नेहमीच्या व्यवहारात मान्य केला आहे.ही एक मानवी वृत्ती आहे. कधीकधी आपण प्राण्यांशी जोडणाऱ्या भाषेतही त्याचा उपयोग करतो. मग symbol हे काय असू शकते. एखादे चित्र एखादा आवाज, एखादे निशाण, एखादी मुद्रा चेहऱ्याची किंवा करांगुलांची. 'मुद्राशास्त्र' म्हणूनही एक साधना शास्त्र आहे व वैदिक यज्ञाची साधना करणारा एक पंथ दक्षिण भारतात आहे. ते काहीही मंत्र पठण करत नाहीत. फक्त हस्त मुद्रा चेहऱ्यावरील मुद्रा करतात. भारत नाट्य किंवा इतरही नाट्यप्रकार, विशेषतः कथकली वगैरे!! आपल्या मौखिक भाषेखेरीज केवळ हावभाव व मुद्रा व अभिनव यांनी कित्येक गोष्टी आपल्या मेंदूपर्यंत व हृदयापर्यंत पोचवतात. शास्त्रीय संगीतातही अशी अनेक सामर्थ्ये आहेत की ज्या योगे मूक प्राण्यापाशी संकेत व भावना, आवाहने पोचवली जातात.

याचा दुसरा अर्थ हा कीं हे निरनिराळे 'फॉर्मस' ह्यांची एक भाषा आहे व कदाचित ती नेहमीच्या written language लिखीत भाषेपेक्षा जास्त सामर्थ्यवान व प्रभावी आहे. Comprehensive बहू समावेशक, बहुव्यापी आहे. तिच्या वापरांत शरीराचे अवयव, आवाज, मुद्रा, हावभाव, बॉडी लँग्वेज, किंवा कदाचीत ह्या सर्वांना बाजूला टाकून Direct सरळ सरळ आपला मेंदू व हृदय आणि Consciousness चैतना शक्ती द्वारे आपण 'दुसऱ्याशी' 'बोलू' शकतो संवाद करु शकतो. मॉडर्न सायन्स असे मानते की Atoms ही असा मर्यादित व्यवहार दुसऱ्या Atomशी करतात व त्याला अंतराचे बंधन नसते.

तेव्हा आपली लिखीत भाषेवरची श्रद्धा थोडी सैल केली व डोळे मोठे करुन - तिसऱ्या डोळ्यांनीही बघता येते व 'ज्ञानप्राप्ती' करता येते हे मान्य केले, तर ऋषी मुनींना 'वेद' हे अपौरुषेय ज्ञान - ईश्वराकडून किंवा वाटल्यास निसर्गाकडून 'सरळ' साक्षात्कारी मार्गाने प्राप्त झाले ह्यावर विश्वास ठेवावयाला हरकत नसावी.

आपण तैतरीय उपनिषदांतून जड ज्ञान - चैतन्य शक्ती व विचार. Thought form ह्या होणाऱ्या Evolutionary क्रिया पाहिल्या. त्याच develolutionary सुद्धा होऊ शकतात.

तश्याच ह्या क्रिया ह्या अफाट, अगम्य विश्वातील व्यवहार ज्या अदृश्य अशा संकल्पनेवर आधारलेल्या आहेत त्या एका मूळ इच्छेच्या, कल्पनेच्या, संकल्पनेच्या म्हणजेच knowledge forms - Thought forms म्हणजे ज्ञान संकल्पना किंवा विचार संकल्पनाच्या आधारावर चालत असणार !!

## कुंडलिनी जागृती

ह्या प्रक्रिया, एका Direct सरळ भाषा पद्धतीने जिला आपण Intutive साक्षात्कारी पद्धत म्हणून, ती एक मर्यादित जीवन असलेला, पण साधना करणारा व 'अधिकार' प्राप्त करणारा, असा मानव ती प्राप्त करू शकेल, हा विश्वास बसावयाला हरकत नसावी.

आणि, ह्या विश्वासाला काही 'अंधविश्वास' म्हणता येणार नाही. त्याची यंत्रणा सांगणाऱ्या ज्ञानपद्धती अजूनही तोकड्या मोकड्या, विस्कळीत पद्धतीने का होईना, पण भारतीय परंपरेत आजही उपलब्ध आहेत. समाज ज्ञानात त्या अनेक संप्रदायामध्ये वापरात आहेत. 'शक्तीपात क्रिया व कुंडलिनी जागृती' क्रिया रामकृष्ण परमहंस, ज्ञानेश्वर, विष्णुतीर्थ महाराज (देवास, उज्जैन) ह्यांच्या जीवनातून व्यक्त झालेल्या आहेत. हे काही फार दूरचे संदर्भ नाहीत. !!

## मॉडर्न भारतीय

फरक एवढाच आहे की आजचा भारतीय माणूस हा मॉर्डन भौतिकवादी ज्ञानाने भारलेला आहे व त्या 'मॉडर्न ज्ञानाचे' 'भारवाहक' भारतीय ज्ञानाबद्दल संशय निर्माण करण्यात गुंतलेले आहेत व स्वतः असहिष्णू आहेत. राज्यसंस्था व शिक्षण संस्थाही ह्या पूर्वग्रहाने भारलेल्या आहेत.!!

## सामाजिक गोंधळ व उपाय

पम, मग, आपण वर पाहिलेल्या राजकीय गोंधळांचे कारण एखादे 'देवीचे चित्र' किंवा 'कल्पना चित्र' होऊ शकते व समाजात गोंधळ माजतो- त्याचे निराकरण काय फक्त पोलिस कमिशनर व बंदुकीच्या गोळ्यांनी व्हावे?

## प्रतिमाशास्त्र

ह्या Symbol Science चा भारतीय स्पिरीच्युअल ज्ञानात कोणता नेमका उपयोग होतो-ते आपण दिशाच्या पुढच्या अंकात पाहू या.

**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेजवळ,
अग्यारी लेन, ठाणे - ४०० ६०१.
Tel. : 2536 84 50
Email : yrsane@eth.net

□□□

**आपल्या प्रतिक्रिया आवर्जून कळवा !**

# सूर्य देवताविषयक माहिती

## (लेखांक दुसरा)

*सूर्य हा विश्वाचा मूलाधार आहे. भारतीय संस्कृती सूर्योपासक आहे. या देवतेसंबंधी मूलभूत माहिती असणाऱ्या लेख मालेतील हा पुढील लेख - संपादक*

### सूर्याची वैशिष्ट्यपूर्ण अनेक नावे

विविध घटना प्रसंगाने, अनेक पुराणांतरी स्थळ काळ या अनुषंगाने सूर्याला अनेक नावाने संबोधिले आहे. एकाच व्यक्तीची व पदार्थांची अनेक पर्यायवाची नावे संभवतात. उदाहरणार्थ - कमळ, जल, वायू, अग्नी यांना अनेक पर्यायी नावे आहेत. भगवान शिव विष्णु यांची सहस्त्रनामे आहेत. सगुण उपासना व आध्यात्मिक क्षेत्रात त्यांच्या ह्या नांवांची विशेष उपयुक्तता असल्याचे आढळते. या देवतांची स्तोत्रेपण आहेत. विष्णुसहस्त्रनाम, शिवसहस्त्रनाम तसेच देवी दुर्गेची पण अनेक नावे आहेत. ललितासहस्त्रनाम अत्यंत पवित्र मानले जाते. नावाप्रमाणे त्या देवतांची शरीरे असतात. त्यांचे स्मरण हा या नामामागील हेतू असतो. कोणत्याही नावाने देवतांचे स्मरण, पूजा, अथवा दर्शन आपल्याला घडल्यास ती उपासना सफल झाली असे म्हणावे.

आदित्याच्या बारा नावांमुळे त्याचे गुण, रूप, स्मरण, श्रद्धापूर्वक करता येते. ही बारा नावे अशी आहेत. इन्द्र, धाता, अर्यमा, त्वष्टा, पूषा, विवस्वान्, सविता, मित्र, वरूण, अंशु, भग, विष्णु.

वर्षभरात आदित्याची बारा नावाने उपासना केली जाते. प्रत्येक महिन्यात आदित्याचे एक वेगळे नाव असते. त्या महिन्यात त्या नावाने आदित्याची उपासना, आध्यात्मिक, पर्यावरणीय व भौतिक रूपात केली जाते. या नावाचा संबंध या तिन्हींत असल्याचे लक्षात येईल.

| महिन्याचे प्रचलित नाव | महिन्याचे वेदकालीन नाव | उपासनेसाठी आदित्याचे नाव |
|---|---|---|
| चैत्र | मधु | धाता |
| वैशाख | माधव | अर्यमा |
| ज्येष्ठ | शक्र | मित्र |
| आषाढ | शुचि | वरूण |
| श्रावण | नभ | इंद्र |
| भाद्रपद | नभस्य | विवस्वान |
| आश्विन | तप | पूषा |
| कार्तिक | तपस्य | पर्जन्य |
| मार्गशीर्ष | सह | अंशु |
| पौष | पुष्य | भग |
| माघ | इस्र | त्वष्टा |
| फाल्गुन | ऊर्ज | विष्णु |

सूर्याची आराधना या नावांनी करतात व फल प्राप्ती करून घेतात.

मानसं वाचकं वापि कायजं यत् च दुष्कृतम् ।

सर्वं सूर्य प्रसादेन तत् अशेषं व्यपोहति ।

एक अहेन यत् भानोः पूजायाः प्राप्यते फलम् ।

यथोक्त दक्षिणैः विप्रैः न तत् क्रतु शतैरपि।

<u>धाता</u> - सृष्टिकर्ता, <u>अर्यमा</u> - वायुरूपात संपूर्ण विश्व व्यापणारा, <u>मित्र</u>-विश्वाच्या हितासाठी तपस्या करणारा <u>वरूण</u>- जलात राहून सृष्टीचे पोषण करणारा, <u>इंद्र</u> - शत्रूचा नाश करणारा, <u>विवस्वान</u> - अग्नीत स्थिर राहून अन्न पचन

करणारा, पूषा - अन्नाने सर्वांचे पोषण करणारा, पर्जन्य - मेघात राहून पाऊस पाडणारा, अंशु-वायूत राहून विश्वाचे कल्याण करणारा, भग-संपूर्ण ऐश्वर्याने मानवी रूपात राहणारा, त्वष्टा - वनस्पती पुष्ट करणारा विष्णु - शत्रूचे दमन करण्यासाठी वारंवार अवतरणारा. या बारा नावांनी विश्व व्यापून टाकले आहे.

या बारा आदित्याच्या नावे कोणते गुण व कोणते प्रभाव लक्षात येतात याचा विचार येणेप्रमाणे -

**इंद्र** - हे आदित्याचे पहिले रूप आहे. आदित्याचा एक अवतार इंद्र आहे. ज्या देवाधिपती इंद्राचा पुराणांतरी उल्लेख होत असतो तो सूर्याचाच एक अवतार आहे. तोच देवराज म्हणून मानला गेला आहे. हा अवतार सर्वात शक्तिशाली असा आहे. देवगणांच्या शत्रूचे दमन करणे यात हा सक्षम आहे. देवगणांचे रक्षण करणे हे त्याचे प्रथम कर्तव्य आहे.

**धाता** - सूर्य देवाचा हा दुसरा अवतार, धाता या नावाने प्रसिद्ध आहे. हा प्रजापतीच्या रूपात प्रतिष्ठित आहे. विविध प्रजा व सृष्टी निर्माण करणे यात गढलेला. याला सृष्टि कर्ता असेही म्हणतात.

**पर्जन्य** - हा सूर्य देवाचा तिसरा अवतार. याला पर्जन्य असे नाव आहे. मेघ मंडळात याचा नित्य वास. याच्या किरणांच्या प्रभावाने ढग वितळतात व जलधारा कोसळतात.

**त्वष्टा** - हा सूर्य देवाचा चौथा अवतार. याला त्वष्टा असे नाव आहे. याचे निवासस्थान समस्त वनस्पती जगतात. लता, वेली, वृक्ष आदिमध्ये निवास करणारी त्वष्टा देवता, आपल्या तेजाने त्यांना प्रभावशाली करत असते.

**पूषा** - सूर्य देवाचा हा पाचवा अवतार. पूषा नावाने प्रसिद्ध. याचे निवास स्थान अन्नधान्यात. पूषामुळे पोषण केले जाते. याच्यामुळे अन्नाला पौष्टिकता प्राप्त होते. त्यामुळे संपूर्ण मानवाचे पोषण होते. सर्व अन्नातील रुची, पौष्टिक तत्त्व, शक्ती, स्निग्धता याच्यामुळेच विद्यमान आहे. मानव समाजाचे पोषण होत असल्याने, अन्नाला सर्वाधिक प्राधान्य प्राप्त झाले आहे.

**अर्यमा** - सूर्य देवतेचा हा सहावा अवतार. हा वायुरूपात समस्त चराचर, देव, मानव, जीव-जंतु तसेच वनस्पती जगत यांना प्रभावित करतो.

**भग**- श्रीसूर्यदेवाचा हा सातवा अवतार. समस्त प्राणी मात्रात अंगांगी भावाने राहणारा, देहधारी तसेच दृश्य व अदृश्य या सर्वात निवास करणारा भग देव, शरीरात चैतन्य, कामभाव व जिवंतपणा यांचे पोषण करतो.

**विवस्वान** - हा सूर्याचा आठवा अवतार, हा साक्षात अग्निस्वरूप आहे. याला विवस्वान असे नाव आहे. अग्नीत जी काही उष्णता वा तेज हे तत्त्व आहे. ती स्वयं सूर्य देवताच आहे. शेत पिकविणे. फळे पक्व करणे, पाण्याचे शोषण करणे, थंडीपासून बचाव करणे. जे खाद्य प्राणी खातात त्याचे पचन करणे इत्यादी हाच अग्नी करत असतो. जिथे आग, उष्मा निर्माण होतो तिथे विवस्वान ही देवता उपस्थित असते असे समजावे.

**विष्णु**- हा सूर्यदेवाचा नववा अवतार. देवगणाच्या शत्रूंचा संहार करणे, सर्व सृष्टीचे पालन करणे आदी कार्ये करणारा भगवान विष्णु स्वयं सूर्यदेवच आहे. म्हणूनच बारा नावात विष्णुचाही समावेश केला गेला. देवगण शत्रूनाशार्थ जेव्हा केव्हा भगवान विष्णु अवतार घेतो असे म्हटले जाते तो सूर्य रूपातला नववा अवतारच आहे असे मानावे.

**अंशुमान**- सूर्य देवाचा दहावा अवतार. वायू रूपातील प्राणतत्त्व बनून जो हा आदित्याचा अवतार आहे तो समस्त प्राण्यांना सतेज टवटवीत जिवंत व उत्फुल्ल बनवितो. या अवताराला अंशुमान असे नाव आहे.

थोडक्यात वायूतही सूर्यतत्त्व समाविष्ट आहे. अग्नी व वायू यांना सूर्याचे परावर्तित रूप अथवा अंश मानले जाते.

**वरूण** - हा सूर्य देवाचा अकरावा अवतार. जल तत्त्वाचे प्रतिनिधित्व करणारी देवता. याला वरूण असे म्हणतात. पाण्याचा उपयोग सर्वज्ञात आहे. ज्याप्रमाणे वायु अग्नी सृष्टींत आवश्यक व उपयुक्त, त्याचप्रमाणे पाण्याचेही आहे. पाणी जीवनाचा आधार आहे. पाण्याचा अभाव झाला असता वृक्ष, वेली, पशू,पक्षी, मानव, जीव, जंतू यांचे जीवन धोक्यात येते. संपूर्ण ब्रह्मांडालाच जलाची आवश्यकता आहे. जलाची अधिष्टात्री देवता वरूण आहे. हा नित्य जलाशयात वास करतो. पाण्यावर निर्भर राहून सर्वांचे पोषण करतो.

**मित्र**- हा आदित्याचा बारावा व शेवटचा अवतार. याचे नाव मित्र असे आहे. नदीतीरी बसून समस्त ब्रह्मांडाचे कल्याण व्हावे, या इच्छेने तपश्चर्या करणारा हा मित्र सूर्याचाच हा अंश आहे. हा चराचर व्यापून राहातो. आपल्या प्रभावाने समस्त लोकांचे पालन पोषण, नियंत्रण करतो व हे सारे अवलोकन करतो.

याव्यतिरिक्त सूर्याची आणखी बारा नावे आहेत. ती येणे प्रमाणे. आदित्य,सविता, सूर्य, मिहिर, अर्क, प्रभाकर, मार्तण्ड, भास्कर, भानु, चित्रभानु, दिवाकर व रवि. अमर कोशकरांनी सूर्याची एकवीस नावे दिली आहेत. ऋग्वेदात सहा नावे आढळतात. मित्र, अर्यमा, भग, वरूण, दक्ष, अंश. काही विद्वानांनी संशोधन करून ध्वनी शास्त्रानुरूप त्याला आवाहन करण्यासाठी काही विशिष्ट नावे दिली आहेत. ही नावे सूर्य देवतेच्या उपासनेसाठी उपयुक्त असून अत्यंत प्रभावी मानली गेली आहेत. ती एकवीस नावे येणे प्रमाणे - विकर्तन, विवस्वान, मार्तण्ड, भास्कर, रवि, लोक प्रकाशक, श्रीमान, लोकचक्षु, महेश्वर, लोकसाक्षी, त्रिलोकेश, कर्ता, हर्ता, तमिस्रहा, तपन, तापन, शुचि, सप्ताश्व, वाहन, गभस्तिहस्त, ब्रह्म, सर्वदेवनमस्कृत, ब्रह्म पुराणात या एकवीस नावांची प्रशंसा करण्यात आलेली आहे. जी व्यक्ती नित्य सूर्योदयी दर्शन घेऊन भगवान भास्कराचे स्तवन करील; त्याचे जीवन-यशस्वी होईल. सूर्यकृपेने त्याचे भौतिक जीवन सुखमय होईल.

एकदा ऋषिमुनी समवेत असलेल्या सभेत ब्रह्माजीचे बोलणे चालू होते. त्यांनी आदित्याची अनेक नावे सांगून वर्णनही केले. या देवतेची अष्टोत्तर शत नामाचा उच्चार करून जो श्रद्धापूर्वक व नियमित पूजन, जप तप आदी करील त्या साधकाचे मनोरथ निश्चितपणे सुफलित होतील. लोकहितार्थ मुनीजनांनी प्रार्थना केल्यावरून, ब्रह्माने ही १०८ नावे सांगून सूर्योपासनेला प्रेरणा दिली व त्यांना उपकृत केले.

याव्यतिरिक्त आणखी बारा नावे सर्व सामान्यांना जपासाठी सांगितली आहे. प्रतिदिन बारा माला जप केल्याने सर्व प्रकारे सौख्य प्राप्त होईल असे सांगितले आहे. ही नावे इतकी प्रभावशाली असल्याचे म्हटले आहे. पुष्कर क्षेत्रात (राजस्थान) साधना केल्यास कल्पनातील लाभ प्राप्ती होईल असे म्हटले आहे. भगवान सूर्याची बारा नावे - आदित्य, भास्कर, भानु, चित्रभानु, विश्वप्रकाशक, तीक्ष्णांशु, मार्तंड, सूर्य, प्रभाकर, विभावसु, सहस्रांशु व पूषन्.

**सूर्य व बारा ज्योतिर्लिंगे**

ऋषिजनांच्या मान्यतेप्रमाणे सूर्य, चंद्र, अग्नी हे तीनही ज्योती स्वरूप आहेत. हेच महेश्वराचे तीन नेत्र आहेत. तोच विश्वाचे नियंत्रण करीत असतो. त्याला शिव असेही म्हणतात. तीन नेत्र असलेला शिव हा सूर्य भगवान याचा रूद्रावतार आहे. रूद्र अकरा आहेत. आदित्य बारा आहेत. म्हणून रूद्र सूर्यरूपात बारा आहेत. प्रत्येक रूपाला एक ज्योतिर्लिंग म्हटले गेले आहे. सांप्रतही बारा ज्योतिर्लिंगाचे पावित्र्य अबाधित राखले गेले आहे. ती भारतीय समाजाची श्रद्धा केंद्रे आहेत. कोणी त्याला शिवाचा अवतार मानतात, कोणी सूर्याच्या अवतार रूपातले रूद्र म्हणतात. फरक

काहीच पडत नाही. यांचा प्रभाव अबाधित आहे. द्वादश ज्योतिर्लिंगाची माहिती संक्षेपात असलेला श्लोक -

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैल्ये मल्लिकार्जुनं ।
उज्जयिन्यां महाकालं ओंकारं अमलेश्वरम्।
केदारं हिमवत् पृष्ठे डाकिन्यां भीमशंकरम् ।
वाराणस्यां च विश्वेशं त्र्यंबकं गौतमी तटे ।
वैद्यनाथं चिता भूमी नागेशं दारूका वने ।
सेतु बन्धे च रामेशं घुश्मेशं तु शिवालये ।

अकरा रूद्राची - भूः भुवः - स्वः मधील वेगवेगळी नावे :-

अधिभूत अकरा रूद्र - पृथ्वी, जल, तेज, वायू, आकाश, सूर्य, चंद्र, आत्मा, पवमान, पाठक, शुचि.

सूर्यमण्डलातील अकरा रूद्र -विरूपाक्ष, भैरव, नकुलिश, सेनानी, त्र्यंबक, सवितृ, जयन्त, पिनाकी, अपराजित, अहिर्बुध्न्य, अजएकपात्

अन्तरीक्ष अकरा रूद्र - भ्राजमान, व्यवदान, वासुकी, वैद्युत, रजत, पुरूष, श्याम, कपिल, अतिलोहित, ऊर्ध्व, अवपत्तन.

अग्नि तत्त्वाच्या सात जिभा - मुण्डक, उपनिषदात या बद्दल वर्णन आहे.

काली, कराली च मनोजवा च सुलोहिता या च सुधुम्रवर्णा ।

विस्फुल्लिंगिनी विश्वरूची च देवी लेलायमाना इति सप्त जिव्हा ।

शक्ति साधना करत असताना साधक या श्लोकाने उपासना करतात.

### सूर्यांचे सात किरण

ही एक सत्य घटना आहे. सूर्यापासून सात प्रकारची किरणे बाहेर पडतात व ती साऱ्या विश्वाला वेगवेगळ्या पद्धतीने प्रभावित करतात. संक्षेपाने सप्त किरणांची माहिती.

सुषुम्णा चंद्राच्या ठिकाणी जी शीतलता व अमृतत्व आहे ते या सूर्याच्या किरणाने त्याला प्राप्त होत असते. या किरणाने चंद्रकला, किरण, सौंदर्य, चांदणे, शीतलता आदी पोषण केले जाते. ही किरणे अक्षुण्णपणे चंद्राला त्या अवस्थेत राहण्यास मदत करतात. कृष्ण पक्षात कला क्षीण होणारा चंद्र शुक्ल पक्षात कला वर्धन पावतो. त्यावेळी या किरणांचा उपयोग होतो. या किरणांच्या द्वारे चंद्रमा चराचर जगावर अमृत वर्षाव करतो. ही सत्य गोष्ट आहे की, चांदण्यात अंग पुलकित होते. आनंदित होते, शीण नाहीसा होतो आणि खऱ्या अर्थाने मानव विश्रांती अनभवू शकतो. हे सारे सुषुम्णा किरणाने चंद्राला प्राप्त होते.

सुरादना - चंद्रातील अमृतत्वाचे रक्षण करणारा हा किरण आहे, हे सामर्थ्य चंद्राला सूर्य देवतेने प्राप्त होते. इतर देवताना चंद्रासारखेच मानले जाते.

उदन्वसु - सौर मंडळातील एक प्रमुख ग्रह मंगळ आहे. हा ग्रह उदन्वसु किरणामुळे उत्पन्न झाला आहे. मंगळ ग्रह आपल्या प्रभावाने सर्व शरीरात रक्ताभिसरण करतो. वास्तविक हे सामर्थ्य या किरणापासून त्याला प्राप्त झाले आहे. यामुळे प्राणिमात्राच्या शरीरात रक्त संतुलन होत राहते. ज्याला ही उदन्वसु किरणे थेटपर्यंत त्याच्या शरीराला स्पर्श करतात. त्याचे सारे रक्तसंबंधी विकार नष्ट होतात व त्याला स्वास्थ्य लाभते. तो शक्ती , ओज, तेज, या वैभवाला प्राप्त होतो.

विश्वकर्मा - सौर मंडळात एक छोटासा ग्रह बुध नावाने ओळखला जातो. विश्वकर्मा किरणांनी तो घडला आहे. हे किरण प्राण्यांच्या बौद्धिकतेला प्रेरक आहेत. त्याला शांत व समचित्त बनवतात. अशा प्रकारे सूर्याचे हे किरण प्राण्यांच्या बौद्धिकतेला उपकृत करतात. या किरण स्पर्शाने व्यक्तीच्या जीवनात परिवर्तन होते. मानसिक

अस्थिरता, ताणतणाव, उद्विग्नपणा, चंचलता, संभ्रम आदी दूर होतात. बौद्धिक वैचारिक संतुलन राखून मन शांत व स्थिर बनवतात. अशा रीतीने व्यक्ती सुखी होते.

**उदावसु** - बृहस्पती या ग्रहाची संरचना या सूर्यकिरणाने घडते. त्यापासून निघालेले हे किरण प्राणी जगतात त्यांचा जीवनक्रम, घटनाचक्र, उत्थान-पतन याचे नियंत्रण करतात. मानवी जीवनात उद्भवणारे संघर्ष प्रसंग यात या किरणांचा फार उपयोग होतो. हे व्याधी नाशक आहेत.

**विश्वव्यचा** - शुक्र व शनी ग्रह यांची घडण या सूर्य किरणाने होते. हा किरण प्राणी जगतात, जीवन व मृत्यू यांचे नियंत्रण करतो. सूर्यापासून निघालेला हा किरण शुक्राच्या माध्यमातून बाहेर पडतो. त्यावेळी तो प्रभावशाली असतो. वीर्याचे तो संवर्धन करतो. शनी ग्रहापासून निघालेला किरण मृत्यू अधिष्ठता असल्याने त्याचे तो पोषण करतो. शुक्रापासून येणारा किरण वीर्य, पराक्रम, कामशक्ती, प्रणय, दाम्पत्य जीवन यांना प्रभावित करतो. शनीपासूनचा किरण अनुकूलतेत लाभतो. मनुष्य दीर्घायु होतो. विपरीततेला हा मारक ठरतो. व्यक्तीला दारूण स्वरूपात मृत्यू प्राप्त होतो. थोडक्यात, शुक्रापासून जीवनदायिनी तर शनीपासून मृत्यूकारक ठरतात.

**हरिकेश** - आकाश स्थित सर्व नक्षत्रांची उत्पत्ती हरिकेश किरणाने झाली आहे. प्रत्येक नक्षत्र आपल्या प्रभावाने भिन्न आहे. या प्रभावामुळे संपूर्ण जगतात जीवन शक्ती, बल, ओज, तेज यांचे वितरण होते, व्यक्तीकडून होणाऱ्या शुभाशुभ कर्मांची प्रेरणा या रश्मीने विशेष रूपाने प्राप्त होते. नक्षत्रांतील सारा प्रभाव या रश्मीमुळेच विद्यमान आहे. नक्षत्र एखाद्याला वाईट वा चांगले असे मानले जाते, त्याचा अर्थ ते नक्षत्र हरिकेश रश्मीने ज्या प्रमाणात प्रभावित झालेले असते त्यावर अवलंबून राहाते. व त्याप्रमाणे जीवनावर त्याचा प्रभाव पडतो.

सारांश, सूर्य किरणे अति प्रभावशाली असून योग्य परिणामकारक होतात, आपण दैनंदिन जीवनात ज्या घटना घडत असलेल्या पाहतो. सार्वजनिक वा वैयक्तिक असो त्या साऱ्या प्रत्येक ग्रह व नक्षत्र या सात सूर्य किरणांनी उद्भासित व प्रभावित झाल्यामुळे घडत असतात. त्यामुळे सुख वा दुःखद अनुभव येत राहतात. सूर्योपासनेत हेच प्रामुख्याने पाहिले जाते की, ही किरणे दुष्प्रभावापासून मुक्त होऊन जीवनात सुख शांती प्राप्त करणारी व्हावीत. म्हणूनच सूर्योपासना अपरिहार्य आहे.

(क्रमशः)

श्री. शं. वा. मठ
६, कुमार आशिष,
राम मारूती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

**दिशा**
**वर्गणीसाठी संपर्क:**
**विद्या प्रसारक मंडळ**
**डॉ. बेडेकर विद्यामंदिर,**
**नौपाडा, ठाणे-४०० ६०२**
**दूरध्वनी २५४२६२७०**

# श्री मच्छिंद्रनाथ

*नवनाथांच्या परंपरेतील पहिले अवतार मच्छिंद्रनाथ त्यांच्याविषयीची ही माहिती- संपादक*

नवनाथ संप्रदाय हा भक्तिमार्गाचा संप्रदाय आहे. या नवनाथांची अवतारकथा ही मानवी आयुष्याला सुंदर आकार देण्याचे सामर्थ्य असलेली कथा आहे, तसेच आपल्यासारख्या प्रापंचिक माणसाला उत्तम आयुष्य जगण्याची शाश्वत ध्रुवदिशा दाखविणारी आहे. अशा या महान नवनाथांपैकी भक्तिरसपूर्ण अशी हा मच्छिंद्रनाथांची कथा आहे. श्रीकृष्णावताराने भारल्या गेलेल्या वैभवसंपन्न अशा द्वापारयुगाची समाप्ती होण्याची वेळ जवळ आली आणि आता कलियुगाची सुरुवात होण्याची जाणीव देवाधिदेव श्रीकृष्ण यांना झाली होती. म्हणून श्रीकृष्णांनी अत्यंत प्रेमाने या नवनारायांणा बोलावून घेतले. त्यांचे मोठ्या प्रेमाने स्वागत करून षोडशोपचारे पूजा केली. हे नऊ नारायण म्हणजे अत्यंत श्रेष्ठ असे ऋषी होते. या भगवंताचे कार्य करणाऱ्या ऋषींची नावे कवी, हरी, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन आणि हॉंग, द्रुमिल, चमस आणि करभादन अशी होती. आता कलियुगाची सुरुवात होणार असल्यामुळे तुम्ही सर्वांनी पृथ्वीतलावर अवतार घेऊन लोककल्याणाचे कार्य करावयाचे आहे व मी स्वतः माझ्या भक्तपरिवारसह तुमच्या या अवतारकार्यात तुम्हाला मदत करणार आहे, असे भगवान श्रीकृष्णांनी त्यांना अमृताने भारलेल्या वाणीने सांगितले. तसेच नवनारायणांनी पृथ्वीवर कोणत्या रूपात प्रगट व्हायचे आहे याची साद्यंत माहिती द्वारकाधीशांनी त्यांना समजावून सांगितली. कवी ऋषींनी मच्छिद्रनाथांचा अवतार व त्यांचा शिष्य म्हणून हरी ऋषींनी गोरक्षनाथाचा अवतार घ्यावा. अंतरिक्षऋषींनी जालंधरनाथ या नावाने अवतार घेऊन कानिफनाथ म्हणून प्रबुद्ध ऋषींनी त्यांच्या शिष्याचे कार्य करावे! तसेच पाचवे ऋषी पिप्पलायन यांनी चर्पटीनाथ, आर्विहोग यांनी नागनाथ, द्रुमिल यांनी भर्तरीनाथ व करभाजन यांनी गहिनीनाथ असे अवतार घेऊन कलियुगात लोककल्याणाचे महान कार्य करावे व भक्तीची ध्वजा फडकवावी असा उपदेश भगवान श्रीकृष्णांनी या सर्व श्रेष्ठ अशा ऋषींना केलाय. श्रीकृष्णांच्या या भाषणाने अत्यंत आंनदित होऊन हे सर्व ऋषिगण आपल्या योगसाधनेसाठी मंदार पर्वतावर गेले व भगवान श्रीकृष्णांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे आपल्या अवताराचा क्षण कधी उगवेल याची वाट पहात राहिले. यांपैकी यमुनानदीच्या तीरावर ध्यानस्थ बसलेल्या कवी ऋषींनी माशाच्या मादीच्या पोटात प्रवेश केला असता भगवान श्रीशंकर पार्वतीसाह तेथे आले व त्यांना अंर्तज्ञानाने सर्व प्रकार कळल्यामुळे त्यांनी कवी ऋषींना आशीर्वाद देऊन तुला श्रीदत्तात्रयांकडून उपदेश होईल असे सांगितले कालांतराने त्या मत्स्यीने नदीतीरावर टाकलेले अंडे बगळ्यांनी चोचीने प्रहार केल्यामुळे फुटले व मत्स्येंद्रनाथांचा जन्म झाला. बाळाच्या रडण्याच आवाज ऐकून कामिक नावाच्या मासे पकडण्यासाठी आलेल्या कोळ्याने त्याला स्वतःच्या घरी नेले. कामिकला पुत्ररत्न नसल्याने त्याने व त्याची पत्नी शारद्वता हिने मत्स्येंद्राचा सांभाळ केला. पुढे तो पाच वर्षांचा झाल्यावर कामिकाने त्याला मासेमारीसाठी नेले परंतु जाळ्यात पकडलेल्या, तडफडणाऱ्या माशांची वेदना छोट्या मत्स्येंद्राला सहन न झाल्यामुळे त्याने सर्व मासे पाण्यात सोडून दिले. त्यामुळे कामिक कोळ्याला त्याचा फार राग आला त्याने

मत्स्येंद्राला अशा कृत्यामुळे तुला भीकच मागावी लागेल असे सांगितल्यामुळे मत्स्येंद्र काही न बोलता तेथून निघाला व उत्तरेकडील बद्रिकाश्रमात गेला व तेथे त्याने बारा वर्षे सूर्याकडे पाहून व केवळ वायूचे भक्षण करून घोर तपश्चर्या केली. योगायोगाने याचवेळी श्रीदत्तात्रेय हे भगवान श्रीशंकराबरोबर भागिरथी नदीवर आले असता त्यांना भगवंतनामाचा ध्वनी ऐकू आल्यामुळे ध्यानस्थ बसलेल्या तरुणाला पाहिले व श्रीदत्तगुरुंनी अत्यंत मायेने मत्स्येंद्राला या घोर तपश्चर्येचे कारण विचारले. तेव्हा श्रीदत्तत्रयांच्या सभोवती पडलेल्या तेजस्वी प्रकाशाकडे पाहून मत्स्येंद्राला भगवंत प्राप्तीची खात्री पटली व त्याने श्रीदत्तात्रयांच्या पायावर लोटांगण घातले. नंतर भगवान शंकरांनी मत्स्येंद्राला ओळखले व श्रीदत्तात्रयांनी मत्स्येंद्राला सर्व सिद्धी प्राप्त करून घाव्यात असे सांगितले. म्हणून श्रीदत्तात्रयांनी सहा महिन्यांच्या अवधीत मत्स्येंद्राला सर्व देवाचें वरदान, पंचमहाभूतांवर विजय मिळविण्याचा अधिकार प्राप्त करून दिला. नाथसंप्रदायाची शृंगी आदी लक्षणे सांगून कान विंधण्याचे संस्कार दिले तसेच यौगिक शक्ती संक्रमित करून दीक्षेचे सामर्थ्य दिले नंतर श्रीशंकराबरोबर श्रीदत्तात्रय कैलासाला निघून गेले. नंतर मत्स्येंद्र दक्षिणेस सप्तशृंगी देवी अंबेच्या जागृत देवस्थानी आले तेथे देवीपुढे सात दिवस स्तवन केले व समाजासाठी एखादे मंत्रभारले काव्य रचावे असे त्यांच्या मनात आले. त्याकरिता शाबरी विद्या प्राप्त करण्यासाठी त्यांना कठोर , साधना करावी लागली. त्यामुळे सर्व देवता प्रसन्न होऊन त्यांना शाबरी विद्येची प्राप्ती झाली. नंतर त्यांनी मोठा काव्यग्रंथ रचला. पुढे वंगप्रदेशात गेल्यावर मच्छिंद्रनाथांनी सरस्वती नावाच्या स्त्रीला पुत्रप्राप्तीसाठी भस्म व अंगारा दिला. परंतु तिने तो भारलेला अंगारा इतर स्त्रियांच्या सांगण्यावरून भक्षण न करता गाईच्या गोठ्यात टाकून दिला व त्यामुळे गोरक्षनाथांचा जन्म झाला. गोरक्षनाथांचे आपले गुरू मच्छिंद्रनाथांवर एवढे प्रेम होते की त्यांनी आपला डोळा गुरूंसाठी काढून दिला; यामुळे मच्छिंदद्रनाथ आपला शिष्य गोरखनाथ याची गुरूभक्ती पाहून खुप झाले व गोरखनाथाला श्रीदत्तात्रयांनी त्यांना प्राप्त करून दिलेल्या सर्व विद्या शिकविल्या. संजीवनी मंत्राचेही ज्ञान दिले व आत्मसाक्षात्कारानंतर आपल्या मानवी आयुष्यातील द्वैताची भावना नाहीशी होते ह्याचा प्रत्यक्ष प्रत्यय आणून दिला. स्वतः आपणच रचलेल्या शाबरी विद्येतल्या मंत्राच्या प्रभावाने सर्व देवांना आवाहन करून प्रसन्न करून घेतले. छोट्या गोरक्षनाथाने देवांच्या चरणांवर विनम्र होऊन त्यांचे आशिर्वाद लाभले यामुळे मच्छिंद्रनाथांनी गोरक्षनाथाला देवदेवतांचे पाठबळ मिळवून दिले. पुढे मारुतीरायांनी मैवकिनीला दिलेल्या वचनातून स्वतःची मुक्तता करण्यासाठी मच्छिंद्रनाथांना स्त्रीराज्यात पाठविले. परंतु गोरक्षनाथांना ही गोष्ट न आवडल्यामुळे ते मच्छिंद्रनाथांना घेऊन येण्यासाठी स्त्रीराज्यांत आले. मच्छिंद्रनाथांनाही गोरक्षाला पाहून अतिशय आनंद झाला. दोघेही काही दिवस तेथे राहिले व गोरक्षनाथांनी मच्छिंद्रनाथांना त्यांच्या योग्येतेची महती पटवून दिली व आपली कीर्ती ब्रह्मांडव्यापी आहे, लोकांवर उपकार करण्यासाठी आपण अवतार घेतला आहे. तेव्हा या मोहातून बाहेर पडावे अशी विनंती केली. अशा रीतीने मच्छिंद्रनाथांनी आपल्या शिष्याशी सहमत होऊन दोघांनीही लोककल्याणाचे अत्यंत थोर कार्य केले. शेवटी मच्छिंद्रनाथ गर्भगिरीत राहिले व गोरक्षनाथ गिरनार पर्वतावर दत्ताश्रमात राहिले. अशी ही मच्छिंद्रनाथासह नवनाथांची कहाणी आहे. या कहाणीच्या पठनाने इच्छित फले प्राप्त होऊन धनप्राप्ती होईल. तसेच मनःशांती मिळून मोक्षही लाभेल.

या सर्व नवनाथांना माझे कोटी कोटी प्रमाण

सौ. मालती देवधर

कलाविहार, प्रशांत नगर, नौपाडा,

ठाणे (प.)

•••

# घर एक उद्योग (मंदिर)

*प्रत्येकाने, प्रत्येक घराने उद्यमशीलता जपली, तर अनेक प्रश्न निकालात निघतील हा विचार मांडणारा हा लेख - संपादक*

उद्योगाचे घरी रिद्धी, सिद्धी पाणी भरी। लहानपणी आई वडिलांनी सांगितलेल्या वचनाचा खरा अर्थ आता मला कळू लागला आहे. सामान्य बुद्धीजीवी पालकांस बुद्धी असूनही, इच्छा असूनही आपल्या विद्यार्थ्यांस उच्च शिक्षण देता येत नाही कारण शिक्षण ही फक्त श्रीमंतांची किंवा अती उत्तमोत्तम गुण मिळविणाऱ्यांचीच मक्तेदारी होऊन बसली आहे. त्यामुळे मधले सर्व विद्यार्थी अडचणीत सापडू लागले आहे. त्यात भरीतभर राखीव जागांच्या विद्यार्थ्यांना अग्रस्थान आहेच। यामुळे कात्रीत सापडलेला विद्यार्थी वर्ग शिक्षणापासून वंचित होऊ लागला आहे आणि मग त्रस्त झालेला बुद्धिवान तरुण वर्ग हुशार, गुंड म्हणून होऊ नये असे वाटत असेल तर पालकांनीच त्यांना ताब्यात घेऊन उद्योगास लावले पाहिजे; कारण शिक्षण तर सोडाच, नोकरी मिळणेही दुरापास्त होवून बसले आहे.

याकरिता प्रत्येक घर म्हणजे लघुउद्योग मंदिर, बनले पाहिजे, लघुउद्योग ही त्यातील मूर्ती असेल आणि आपण सारे त्याचे पूजक असू या! यामुळे तरुणांची भिरभिरणारी, अस्थिर, रिकामी मने वाईट दिशेने वाटचाल न करता, उद्योगाच्या - चांगल्या - दिशेने मनाची भरारी मारतील, आणि त्या दिशेने पावले टाकली जातील.

यासाठी पालकांनो, जागृत व्हा! तुमच्या अंगी असलेल्या गुणांना, आवडींना, छंदांना, वाव देऊन त्याला बुद्धीची झालर लाऊन लघुउद्योगास लागा। मग पहा घरातील लहान, थोर आपआपल्या परीने तुमच्या कामास हातभार लावतात की नाही, याने घरातील वृद्ध मंडळी म्हणजे एक अडगळ होणार नाही, त्यांच्या अनुभवाचा, मार्गदर्शनाचा फायदा होऊन त्यांचाही वेळ बरा जाईल. आपल्यालाही कामात मदत होईल. घरातील व्यवसायाला अनुसरुनच मुलांनी शिक्षण घ्यायला हवे किंवा मुलगा एखाद्या व्यवसायात्मक शिक्षणाकडे असेल तर घरातील मंडळींनीही त्यानुसार शिक्षण घ्यावे, म्हणजे उदा. एखादा विद्यार्थी हॉटेल मॅनेजमेंट शिकत असेल, तर घरातील मंडळींनी कोणत्याही खाद्य पदार्थांचा उद्योग सुरु करावा, म्हणजे मुलांचे शिक्षण झाल्यावर त्या उद्योगास शास्त्रीय तत्वांची झालर लागून उद्योग अधिकच जोमाने वाढू लागेल. किंवा या उलटही म्हणता येईल, घरात एखादा लघुद्योग चालू असेल तर त्याच्या अनुषंगाने शास्त्रीय शिक्षण घ्यावे व घरगुती उद्योग वाढवावेत. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत लागणाऱ्या कोणत्याही गोष्टीसंबंधी लघुउद्योग सुरु करावा, एकेक वसाहत उद्योग नगरी होऊ द्या! यासाठी कायद्यात बसणारे सर्व व्यवहार पूर्ण करावे, उद्योग नीट नेटका, प्रामाणिकपणे, दर्जेदार, खात्रीलायक, वाजवी दरात, सर्वांनाच परवडेल असा केला म्हणजे तुम्ही नक्की यशस्वी व्हालच! आणि तुम्हांला धनलाभ होईल, आपल्या धंद्याला उपयुक्त आणखी पूरक उद्योग धंदेही काढू शकाल आणि इतरांनाही तुम्ही उद्योगाचे साधन उपलब्ध करुन द्याल! स्वयंरोजगार तयार होतील. नोकरी करणाऱ्या बाईला बिनधास्तपणे कामाला जाता येईल! कारण तिच्या बाळाची काळजी योग्य पाळणाघरात घेतली जाईल. जाताना डब्यासाठी पोळी भाजीचा डबाही मिळेल तर सकाळी गरम गरम कांदे पोहे सुद्धा मिळतील.

आल्यावर निवडलेली ताजी भाजी, फळे मिळतील, आपला वाळ खुपाल आहे पाहून स्त्रीचा शीण कधीच पळून जाईल. या आणि यांसारख्या अनेक गोष्टींचा ताळमेळ नोकरी करणारे आणि घरगुती उद्योग करणारे यांच्यात जुळवता येईल! जी गोष्ट शहराची, तीच गोष्ट खेडेगावाकडील. तेथील वातावरणाला राहणीमानाला पूरक असे लघुउद्योग सुरु व्हायला पाहिजेत, म्हणजे खेडेगावातील लोकांना शहराचे आकर्षण राहणार नाही, शहराकडे येणारे लोंढे थांबतील, त्यांना बाजारपेठ शहरांत, देशांत, परदेशांतही मिळू शकेल. शहर आणि खेडेगावातील उद्योग एकमेकांवर अवलांबून राहतील व्यापार वाढ होऊन, उद्योग मोठ्या प्रमाणावर सुरू होतील. परंतु यासाठी लागणारे शास्त्रीय शिक्षण प्रत्येकाने घेण्याचा प्रयत्न करावा वा आपले ज्ञान कुंटुंबियांना द्यावे, म्हणजे तयार होणारी वस्तू! माल-सरस, उत्तम प्रतीची असेल, आपण सर्वजण घराघरात बाजारपेठा तयार करु या. एकमेकां सहाय्य करु अवघे होऊ श्रीमंत!

उद्योगासाठी लागणारा पैसा पुरेसा नसेल तर कर्ज घेऊ शकता. परंतु ते माफक प्रमाणातच घ्या, नाहीतर कर्ज फेडण्याचा ताण तणाव नको! मग काय आपण साऱ्यांनी आता व्हायचे ना उद्योजक! फार मोठी नाही पण छोटी स्वप्ने उराशी बाळगून लक्ष्मीपुत्र होण्याचा प्रयत्न करु या!

डॉ. सौ. प्रभा जयंत कर्वे
दूरध्वनी :- २५४०६०६३

### गुलाबाची काही वैशिष्टे

१. गुलाब ही वनस्पती किती जुनी? सुमारे ३ कोटी वर्षापूर्वी मानवापूर्वी अस्तित्वात असावी; असा अंदाज!

२. गुलाबाच्या वनस्पतीकुलास शास्त्रीय भाषेत 'रोझेसी' म्हणतात. या कुलात सफरचंद, चेरी, पीच, स्ट्रॉबेरी इत्यादी फळे वनस्पती येतात आणि त्याची प्रजात आहे 'रोझा.'

३. रानटी गुलाबाला फक्त पाच पाकळ्या असतात.

४. या गुलाबापासून संकराने सध्याचे सुमारे शंभर पाकळ्या असलेले आणि निरनिराळ्या रंगांची सुंदर, डौलदार, सुगंधी फुले देणारे गुलाब तयार करण्यात आले आहेत.

५. शास्त्रज्ञांच्या मते गुलाबाची उत्पत्ती प्रथम आशिया मायनर व पश्चिम चीन या भूप्रदेशात झाली असावी.

६. गुलाबाची फुले विविध आकारांची असतात. वटणाएवढी लहान ते तळहाताच्या वाटीएवढी मोठी!

७. स्वच्छ पांढरा ते लाल, गुलाबी, पिवळा, नारंगी अशा अनेक छटांचा गुलाब लोकप्रिय आहे आणि आता तर प्रयोगांती निर्माण होतोय निळा गुलाब!

८. गुलाबाच्या फुलात सुमारे ०.०१५ ते ०.०४०६ टक्के अत्तर असते. ते काढून जे पाणी उरते त्याला 'गुलाबपाणी' म्हणतात.

९. भारतात अत्तर कोठे बनते? अलिगढ व कनौज येथे मोठ्या प्रमाणावर ते बनते. कनौजी अत्तर फारच प्रसिध्द आहे.

१०. गुलाबापासून गुलकंद बनतो. आयुर्वेदिक व युनानी औषधात त्याचा वापर होतो. गुलकंद नुसताही मस्त, चवदार लागतो.

# दहशतवादाची दहशत

*दहशतवाद या शब्दाचीही दहशत वाटावी असा हा शब्द आहे. या मानवी प्रवृत्ती बद्दलचे हे चिंतन!*

\- संपादक

हा देश आहे सूर्याला तेज आणि चंद्राला शीतलता देणाऱ्या ऋषींचा आणि मुनींचा, शिवाजी महाराज, राणा प्रताप यांच्यासारख्या वीर योध्यांचा हा देश आहे. भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांसारख्या क्रांतिकारकांचा. हा देश आहे. 'चरखा चला चला के, लेंगे स्वराज्य लेंगे।' असं म्हणणाऱ्या म. गांधी, नेहरु, लाल बहादूर शास्त्री यासारख्या शांतिदूतांचा. हा देश आहे यज्ञात सर्वस्व अर्पण करणाऱ्या वाजश्रव्याचा आणि राष्ट्रासाठी आपल्या अस्थिंची आहुती देणाऱ्या दधिचींचा. या देशात एक महापुरुष असा होऊन गेला जो वाजश्रवाही होता आणि दधिचीही, कारण या महापुरुषाने वाजश्रव्याप्रमाणे राष्ट्रासाठी आपलं सर्वस्व समर्पित केलं आणि दधिचीप्रमाणे राष्ट्रासाठी आपल्या शरीराचा कणन् कण झिजवला. या महापुरुषाचं नाव म्हणजे स्वामी विवेकानंद.

११ सप्टेंबर हा दिवस आपल्या सर्वांच्याच चांगला स्मरणात आहे. या दिवसाने २ मनोवृत्तींचे दर्शन जगाला घडविले ११ सप्टेंबर १८९३ रोजी स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत 'माझ्या बंधूंनो आणि भगिनींनो' असं संबोधून संपूर्ण जगाला आपल्या कवेत प्रेमाने व बंधुत्वाने घेतले तर ११ सप्टेंबर २००१ रोजी विकृत मनोवृत्तीच्या लोकांनी अमेरिकेतल world trade centre उध्वस्त केले. जगाला शांततेचा सबुरीचा सल्ला देणारी अमेरिका एकदम त्वेषाने चिडून उठली व त्यांनी युद्दालाच सुरुवात केली. पण WTC उध्वस्त करणाऱ्या लादेनला अमेरिका पकडू शकली नाही हा अमेरिकेचा सगळ्यात मोठा पराभव आहे.

आता मनात प्रश्न निर्माण होतो की, संपूर्ण जगात ११ सप्टेंबर २००१ पासून दहशतवादाला सुरुवात झाली, जेव्हा देशाची फाळणी झाली. तेव्हा दहशतीला सुरुवात झाली की जेव्हा बाबर हिंदुस्थानात आला तेव्हा दहशतवादाची सुरुवात झाली? परंतु या सगळ्या प्रश्नांची उत्तरे नकारात्मक येतील ७११ साली सिंधच्या दाहीर राजावर अफगाण टोळ्यांनी आक्रमण केलं आणि दाहीर राजाच्या सैन्यातील अफगाण सैनिकही फितुर होऊन जेव्हा या अफगाण टोळ्यांना मिळाले तेव्हाच खऱ्या अर्थाने दहशतवादाला सुरुवात झाली.

आजपर्यंत संपूर्ण जगातील अनेक लोकांनी दहशतवादाच्या अनेक व्याख्या केल्या त्यातील इस्त्राएल मधील नेते 'नेत्याहून' यांनी तयार केलेली दहशतवादाची व्याख्या UNO ने मान्य केलेली आहे. ती व्याख्या अशी, 'आपल्या राजकीय व धार्मिक उद्दिष्टांसाठी सामान्य माणसाचा जीव व त्याचे वित्त वेठीस धरणे म्हणजे दहशतवाद.' कोणत्याही दहशतवादाची प्रामुख्याने दोन उद्दिष्टे असतात. पहिले म्हणजे एखाद्या भूभागात आपल्या धर्मानुयायांची संख्या वाढविणे व दुसरे म्हणजे तेथे राजकीय परिवर्तन घडवून तो भाग मूळ देशापासून वेगळा करणे. यातलं पहिलं उद्दिष्ट हे साध्य करण्यासाठी बरंच अवघड आहे व त्याला खूप वेळही लागतो. परंतु दुसरं उद्दिष्ट साध्य करणं तसं सोपं आहे. उदाहरणच दयायचं झालं तर आसाममध्ये सध्या खूप बांग्लादेशी घुसखोर आले आहेत. तेथील ६ जिल्ह्यांचे आमदार हे बांगलादेशी घुसखोरच आहेत व मंत्रिमंडळातील २ मंत्री ही बांगलादेशी घुसखोरच

आहेत.

पाकिस्तानचे पंतप्रधान परवेझ मुशर्रफ असं म्हणतात की, 'काश्मिरमध्ये पाककडून वारंवार होणारे हल्ले हे दहशतवाद नसून अखंड चालू असलेले युध्द आहे. परंतु त्यांच्या या म्हणण्याला काहीही अर्थ नाही. कारण दहशतवाद व युध्द यांच्यामध्ये खूप फरक आहे. युध्दात दोन्ही पक्षांकडे शस्त्रे असतात व सैनिकांची युध्दाची मानसिक तयारीही झालेली असते. परंतु दहशतवादात फक्त दहशतवाद्यांकडेच शस्त्रे असतात. युद्धात सामान्य नागरिकांचा अथवा सार्वजनिक मालमत्तेचा बळी घेण हा मुख्य हेतू मानला जात नाही. परंतु दहशतवादात सामान्य नागरिकांचा विनाकारण बळी दिला जातो. युध्दाचे प्रमुख उद्दिष्ट साम्राज्यविस्तार हे असते, तर दहशतवादाचे मुख्य उद्दिष्ट-एखाद्या विशिष्ट प्रदेशात आपल्या धर्मानुयायांची संख्या वाढविणे हे असते.

दहशतवाद्यांना दहशतवाद पसरविण्यासाठी ३ 'M'अत्यावश्यक असतात. ते म्हणजे 1. Man, 2. Money, 3. Machinary. मदरसे, Convents, वेगवेगळ्या धार्मिक संस्था यांमधून दहशतवादी Man Power निर्माण करतात. त्याचबरोबर वेगवेगळे Training Comps आयोजित करतात. व त्यांची जाहिरात BBC वरुन करतात. या Training Camps मध्ये आलेल्या लोकांचा पूर्णपणे Brain wash केला जातो. त्यांना A.K. 47 चालवणे, हँड ग्रेनेड उडवणे या सर्व गोष्टींचे प्रशिक्षण दिले जाते. आदि याया नावाच्या पूर्णपणे इंग्लंडमध्ये वाढलेल्या व या प्रशिक्षण शिबिरात जाऊन आलेल्या मुलाची मुलाखत BBC ने प्रसारित केली. त्यात त्याने म्हटले आहे की 'now, I consider my self as a soldier of Islam' ज्या तरुणांना खरोखर पैशांची गरज आहे व ज्यांना Drugs साठी पैसा हवा आहे अशा तरुणांना या दहशतवादी संघटना आपले लक्ष्य बनवितात. चेचिनियात स्त्रियांचाही मानवी Bomb म्हणून वापर केला जातो. तिथल्या Commander ने Asian age मध्ये म्हटलेले आहे 'now we have more bombers than bombs.' हे दहशतवादी उच्चशिक्षित असतात. ते अद्ययावत सुविधांचा वापर करतात London मध्ये विमानतळावर होणाऱ्या बॉम्ब स्फोटाचा कट उघडकीस आला. या तपासात असे लक्षात आले की दहशतवाद्यांनी तो Bomb द्रव स्वरूपात लहान मुलाच्या दूध पिण्याच्या बाटलीत ठेवला होता.

'Quaranic way of Islamic war' या १३ खंडांच्या पुस्तकात दहशतवाद कसा पसरवावा याचे विस्तारपूर्ण दर्शन घडते. त्याचबरोबर ABC of Terrirism या Osama Bin Laden लिखित पुस्तकातही दहशतवादाबद्दल बरीच माहिती मिळते. त्यातील मुख्य तत्त्व आहे, 'Kill one a frighten 10,000. याच पुस्तकात पुढे Osama Bin Laden ने म्हटलेले आहे की, I want my people to spread terrirism is such a way that the crows in nest should also frighteness.

आजकाल या दहशतवादाचं स्तोम इतकं वाढत चाललंय की त्याचीच दहशत निर्माण व्हायला लागली आहे. दहशत व भीती या गोष्टींमध्येही खूप फरक आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला एखाद्या गोष्टीची भीती वाटते तेव्हा त्यात त्या व्यक्तीची काहीना काही तरी चूक असते. परंतु दहशत म्हणजे धास्ती. यात सर्वसामान्य व्यक्तीची काहीच चूक नसते. मग अशा परिस्थितीत सर्वसामान्य माणसाने करावं तरी काय? दहशतवाद्यांनी A. K. - 47 तयार केल्या म्हणून आपण A. K. - 56 तयार करायच्या का? तर नाही. आपण आपली हत्यारं वापरायची व लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करायचा. वक्तृत्व हे माझं हत्यार असेल तर लेखणी हे एखाद्या कवीचं हत्यार असेल दहशतवाद मिटवण्यासाठी आपण कायम आशावादी दृष्टिकोन ठेवायला हवा. याबाबत पंजाबचं

उदाहरण डोळ्यासमोर ठेवता येईल. दहशतवादी दहशतवाद कशामुळे पसरवितात? त्यांना मिळणाऱ्या Local support मुळे. हा Local support काढून घेतला पाहिजे. दहशतवादाचा हा वृक्ष मुळापासूनच उपटून टाकावा लागेल. त्यासाठी 'मला काय त्याचे' ही वृत्ती सोडावी लागेल. हा देश माझा आहे आणि प्रसंगी या देशासाठी मी प्राणार्पण देखील करीन ही राष्ट्राला व्यापून दशांगुळे उरणारी राष्ट्रभक्तीची भावना प्रत्येकाच्या मनामनात जागृत झाली पाहिजे. त्यासाठी आपण स्वत:पासून सुरुवात केली पाहिजे. माझ्या आजूबाजूला जर एखादे संशयास्पद कृत्य घडत असले तर त्याची माहिती मी लगेच पोलिसांना दिली पाहिजे.

एकदा अकबराने दरबारात एक रेघ काढली व ती रेघ न पुसता बारीक करण्यास सांगितली. कुणालाच हे जमेना. शेवटी बिरबलाने त्या रेघेखाली एक मोठी रेघ काढली त्यामुळे बादशाहची रेघ आपोआपच लहान झाली. त्याचप्रमाणे दहशतवादाच्या रेघेखाली राष्ट्रभक्तीची मोठी रेघ काढली की दहशतवादाचं प्रमाण खूपच कमी होईल. म्हणूनच मला म्हणावसं वाटतं,

"राष्ट्रभक्ती ले हृदय में

हो खडा यदि देश सारा।

संकटो पर मात कर

यह राष्ट्र विजयी हो हमारा ॥"

**संहिता ज. करमळकर**
'अद्वैत', तपोधन सोसायटी,
शाहू कॉलेज रोड, पर्वती,
पुणे - ९.
Phone No :- 24222164

•••

## पसायदान



आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ॥ १ ॥

जे खळांची व्यकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ॥ २ ॥

दूरिताचे तिमिर जावो ।
विश्व स्वधर्मसूर्ये पाहो जो जे वांछिल तो तें लाहो ।
प्राणिजात ॥ ३ ॥

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥ ४ ॥

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ ५ ॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥ ७ ॥

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । हो आवें जी ॥ ८ ॥

येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखया जाला ॥ ९ ॥

# खरंच गरज आहे मराठीला 'रोमँटिक' करण्याची (एक प्रतिक्रिया)

*मराठी गद्य साहित्यातील सौंदर्य वाद या संदर्भात ललितमध्ये आलेल्या एका, लेखावरील विचार मांडणारा हा लेख*
- संपादक

आयुर्विम्याला पर्याय नाही तसं 'रोमँटिक' शब्दालाही पर्याय (पर्यायीशब्द) मराठीत नाही असे डॉ. मिलिंद बोकील यांनी आपल्या भाषणात म्हटले होते. पर्यायी शब्द सुचवला तर तो बोजड किंवा जास्तच अवघड ठरेल. जसं 'टेबल' ला मेज, 'डिपॉझिटला' अनामत म्हटलं तर कोणाला कळणार आहेत हे शब्द! (त्यापेक्षा मूळ इंग्रजी शब्दच चटकन समजतात एवढे ते मराठीच झालेले आहेत.)

फक्त रोमँटिक हे विशेषण शृंगारिक, अश्लिल, उथळ, छचोर, भडक, विकृत अर्थी वापरलेले नाही तर विशुद्ध, अलौकिक, उदात्त प्रेम (प्रीती) या अर्थी अभिप्रेत आहे. भाषा हे संवादाचे माध्यम आहे ते मनुष्याचे सांस्कृतिक पोषण करते. भाषेत तीन प्रकारचा ऐवज असावा लागतो. सामाजिक, आध्यात्मिक व रोमँटिक. या तिन्हीमुळे लोकांचे सांस्कृतिक जीवन समृद्ध होते. यांपैकी सामाजिक व अध्यात्मिक बाजू मराठीत उजवी आहे. दलित साहित्याच्या फुटलेल्या झऱ्यांमुळे ते व्यापक बनलेले आहे. सामाजिक समतेची, विचारांची जाणीव परंपरा दीडशे वर्षांहून जुनी आहे. अध्यात्मिकतेच्या बाबतीतही मराठीत ज्ञानेश्वर, तुकारामांपासून ते आजच्या विनोबा, पांडुरंगशास्त्री आठवले पर्यंत मोलाची भर पडलेली आहे.

तिवईचे तिन्ही पाय पक्के भक्कम हवेत तरच ती उभी राहील. सामाजिक, अध्यात्मिक हे साहित्य संस्कृतीचे पाय मजबूत आहेत. पण रोमँटिक हा पाय मात्र लंगडा आहे. रोमँटिक पणातच मराठीची बाजू कमकुवत, लंगडी आहे. हा रोमँटिकमपणा भाषा किंवा साहित्यात सदैव भरून राहिलेला, तरोताजा असायला हवा.

रोमँटिक म्हणजे आजच्या स्त्रीपुरुष विवाहपूर्व किंवा विवाहबाह्य संबंधांवरील बटबटीत, उत्तान, उथळ, उन्मादक, विकृत, शृंगारिक अशा दूरदर्शनच्या हिंदी, मराठी, मालिका, नव्हेत, किंवा तेंडुलकर पितापुत्री, सानिया, मेघना पेठे आदींचे उच्छशृंखल साहित्य नव्हे. स्त्रीपुरुष संबंधांवरच्या लिखाणात मराठी लेखकांचे अनुभव विश्व तोकडे पडते असे म्हटले जाते. जयवंत दळवी यांना या खदखदत्या विषयावर लिहिण्याची उत्कट इच्छा होती पण ती अपुरीच राहून गेली.

भाषेमध्ये किंवा साहित्यात प्रेम कल्पनेला असलेले मुख्य स्थान, प्रेमाचे अनन्य साधारण महत्त्व म्हणजे रोमँटिकपणा. तो कुठल्याही भाषेचा, साहित्याचाच काय पण विश्वनिर्मिती प्रक्रिये मूळ गाभा किंवा मूलाधार किंवा मूलस्त्रोत किंवा मूळ पाया आहे. या विश्वाचा सारा डोलारा त्या विशुद्ध प्रेमभावनेवरच आधारलेला आहे. पुरुष आणि प्रकृती, ब्रह्म आणि माया, शिव आणि शक्ती यांच्या मीलनातूनच या विश्वाचा जन्म झालेला आहे. तीच विश्वयोनी जगदंबा. प्रा. उषा लिमये यांच्या याविषयीच्या ओळी बघा-

घर म्हणजे ही केवळ माया, माती म्हणजे ब्रह्म।
ब्रह्माच्या स्खलनात जाहला या विश्वाचा जन्म॥

सगळं विश्वच या प्रेमाच्या मूलस्त्रोतावर उभं आहे. किती सुंदर, उदात्त, पवित्र कल्पना! सत्यम् शिवम् सुंदरम् च्या पायावर उभारलेली.

पुरुष प्रकृतीच्या म्हणजेच पती पत्नीच्या विशुद्ध, पवित्र, उदात्त, समर्पण, त्याग भावनेतून 'मी' ला विसरायला

लावणाऱ्या एकात्मतेच्या भावनेतून निर्माण झालेलं प्रेम - ज्ञानेश्वरांनी म्हटलंच आहे - चंद्र तेथे चंद्रिका। शंभू तेथे अंबिका। संत तेथे विवेका। असणेच की ॥ दोन मिळून एक अद्वयानंद ज्ञानेश्वरांनीच अमृतानुभवात ही कल्पना मांडली. चंद्र तिथे चंद्रिका, शंभू तिथे अंबिका, विष्णु तिथे लक्ष्मी, राम तिथे सीता असणारच. सूर्य तिथे प्रभा, साखर तिथे गोडी, मोती तिथे मोत्याचे पाणी हे असणारच. हे एकमेकापासून अलग, वेगळे नाहीतच. हीच ती शुद्ध, पवित्र प्रेम भावना, विश्व हे त्या एकात्म, एकरुपतेचे शिव-शक्ती हे विश्वाचं आदीद्वंद्व प्रतीक आहे, विष्णुचा वास असेल तिथेच लक्ष्मी राहते. लक्ष्मी शिवाय विष्णू नाही व विष्णु शिवाय लक्ष्मी. शिवशक्ती सुद्धा एकरुपच आहेत. शिव शक्तीशिवाय प्रगट होऊ शकत नाही व शक्तीही शिवाशिवाय कार्यरत होऊ शकत नाही. प्रत्येक कर्तृत्ववान पुरुषामागे त्याची स्त्री (पत्नी) असते म्हणतात किंवा आजच्या युगात पत्नी मागे पुरुष (पती) असतो म्हणा. स्त्री-पुरुष हे एकमेकांचे प्रतिस्पर्धी नव्हेत ते एकमेकांचे पूरक आहेत. ते एकमेकांशिवाय अधुरे आहेत. हीच ती प्रेमभावना. या प्रेमभावनेपोटी जे साहित्य निर्माण होते ते माणसाला हवेहवेसे वाटते. आणि हे साहित्यातून प्रतिबिंबित, गोचर व्हायलाच हवे. यात संकोच, लाज, कसली! ही तर पवित्र, उदात्त आदीम भावना आहे. हा प्रेमाचा मूलस्त्रोतच साहित्यात नसेल तर साहित्य सुंदर, ताजे टवटवीत, उत्फुल्ल कसे असेल! प्रेम ही एक संजीवक गोष्ट आहे, सर्वव्यापी गोष्ट आहे. यामुळेच कोणतेही साहित्य जिवंत वाटते, राहते. ही प्रेमभावना (किंवा रोमँटिकपणा) सध्याच्या मराठी साहित्यात (ललित गद्यात) व्यक्त झालेली दिसत नाही.

सगळेजण प्रेमावरच जगत असतात पण त्याचा उच्चार (घरात) करणं म्हणजे अब्रह्मण्यम. अर्धवट वयात तर पूर्वी आम्हाला वाटायचं प्रेम फक्त सिनेमातच असतं! प्रत्यक्षात तसं काहीच नसतं. सिनेमात जे दाखवतात ते वाईट असतं. पूर्वी असं वाटणं ठीक होतं, पण आज तर 'खुल्लम खुल्ला प्यार करेंगे हमदोनो' असा जमाना आला आहे. पण हे म्हणजे रोमँटिकपणा नव्हे हे लक्षात ठेवा!

काव्यात प्रेम उदंड आहे कारण तो त्याचा स्थायी भाव आहे. 'क्षण एक पुरे प्रेमाचा वर्षाव पडो मरणांचा' पासून 'प्रेम म्हणजे प्रेम म्हणणे प्रेम असतं' पर्यंतच्या कवितांतून ते दिसून येत. पण प्रेम कसं हवं! कसं अभिप्रेत आहे, तर 'काटा माझ्या पायी रुतला, शूल तुझ्या उरी कोमल का?' असं, किंवा

'गमे की तुझ्या रुद्र रुपात जावे
मिळोनी गळा घालुनिया गळा
तुझ्या लाल ओठातली आग प्यावी
मिठीने तुझ्या तीव्र व्हाव्या कळा! ....असं

मराठी काव्यात हा प्रेमाचा स्त्रोत ज्ञानेश्वरांपासून खळाळून वाहतोय लोकांना गारवा देतोय, पण मराठी ललित गद्यात कथा, कादंबऱ्यात मात्र हा प्रेमाच्या स्त्रोताचा सखोल, गंभीर, प्रगल्भ असा अविष्कार झालेला आढळत नाही. स्त्री पुरुषातल्या या पवित्र, प्रगाढ, उदात्त तितक्याच आल्हाददायक प्रफुल्ल पण तितक्याच व्याकूळ आणि जीवघेण्या पण कृतार्थ अशा प्रेम भावनेवर अभावानेच लिहिलेले आढळते. विशुद्ध प्रेमावरचं साहित्य किती? विकृत प्रेमावरचं तणचं जास्त माजलेलं आणि पोसलेलं दिसतं.

हे विशुद्ध प्रेम, हा रोमान्सच कुठल्याही भाषेची ताकद आहे. सामाजिक,अध्यात्मिक बरोबरच रोमान्स हाही जीवनाचाच नव्हे तर सर्व विश्वाचा स्थायीभाव आहे. भाषेतून हे व्यक्त होईल तरच माणूस भाषेवर प्रेम करेल. आणि असे होणे गरजेचे तसेच आवश्यक आहे.

सध्या तरुणपिढी इंग्लिशाळलेली आहे. त्यामुळे ती मराठीपासून दुरावत - तुटत चाललेली आहे. तारुण्य, तरुणाई म्हणजेच जिवंतपणा, चैतन्य त्यांच्या भावना म्हणजे रोमँटिकपणा भाषेने प्रवाहित केला पाहिजे, वाहता ठेवला पाहिजे तरच तरुणाई मराठीकडे वळेल. विशुद्ध निर्मळ प्रेम रोमँटिकपणा, ही माणसाचीच नव्हे तर सर्व विश्वाचीच गरज

आहे. कारण विश्वप्रक्रिया त्यावरच अवलंबून आहे, आधारलेली आहे. म्हणून सर्व सभ्यता, नैतिकता या सर्वांचे बुरखे झुगारून भाषेला रोमँटिक केले पाहिजे, भाषेतला रोमान्स जिवंत, सळसळता ठेवलाच पाहिजे. या मूलस्रोताने साहित्य सर्वांगाने तरारून, बहरून येईल मग ते एकांगी न राहता विविधांगी संपन्न, समृद्ध होईल.

हिंदी सिनेमाने हा रोमँटिकपणा पुरेपुर, अंगीकारलेला आहे. 'तरुणाई, तरुणाई सळसळत्या तारुण्याची ही आमराई'. हिंदी सिनेमात तसे अनेक दोष आहेत तरी पण त्यात जे चैतन्य तरोताजेपणा आहे तो त्यातल्या रोमान्समुळे आहे. प्रेमाच्या केंद्र बिंदू भोवतीच हिंदी सिनेमाचे कथानक फिरत असते. जागतिक बाजारपेठेची करोडोंची उलाढाल त्यामुळेच होते. प्रेमातली उत्कटता, उत्फुल्लता, असोशी, आनंदच नाही तर प्रेमातली आर्तता, व्याकुळता, दर्द गम हिंदी गाणीच व्यक्त करु शकतात. 'दिल के रासते में कैसी ठोकर मैंने खाई, तनहाई तनहाई', 'नगरी नगरी द्वारे द्वारे ढुंढू रे सावरिया', 'जैसे राधाने माला जपी शामकी मैंने ओढी चुनरियाँ तेरे नाम की', 'घडी घडी मोरा दिल धडके', 'आज मिलन की बेला में', 'सरसे चुनरियाँ क्यु सरके', 'दो हंसो का जोडा बिछड गयों रे', 'कहना है क्या की हम एक अनजानसे जो मिले', नव्या जुन्या गाण्यांची अशी किती उदाहरणं द्यावी! ज्या गाण्यांवर लोक फिदा होतात जीव टाकतात, याचं कारणही त्यातला रोमँटिकपणा. हा मुद्दाही प्रस्तुत लेखात लेखकाने मांडला आहे तो अक्षरशः खरा आहे.

या सर्व गोष्टी थिल्लर नाहीत. प्रेमाची प्रतिती, गहराई रम्य अनुभूती याकडे डोळसपणे, गंभीरपणे, सुसंस्कृतपणे बघण्याची आज गरज आहे.

सामाजिक, आध्यात्मिकता, रोमँटिकता यात कुठलीच गोष्ट श्रेष्ठ वा कनिष्ठ नाही. तर या सर्वांचा समतोल राखला पाहिजे. मराठी भाषेला जर चैतन्य, तजेला, टवटवीतपणा टिकवायचा असेल तर तिच्यातला रोमान्य घालवून चालणार नाही. साऱ्या विश्वाचीच ही आदीम अंतिम भावना आहे. हा प्रेमाचा झरा मराठी साहित्यातूनही असाच झुळझुळ अखंड वाहता राहावला हवा. त्यामुळेच सर्वत्र गारवा नि माधुर्य भरुन राहिल.

ज्ञानेश्वर महाराज प्रेम भावनेविषयी म्हणतात 'इथे शब्दाविना संवाद साधायचा आहे'. 'मी' ला विसरुन दुसऱ्याशी एकरूप व्हायचं आहे. त्याच्याशी भिडायचं आहे, त्याच्याशी अंगलट करायची आहे ती अंग संगाशिवाय. शरीर मीलनापेक्षा मनोमीलन उच्च कोटीतलं- शारीरिक प्रेमाचे चाळे, त्याची बीभत्स, शृंगारिक वर्णने कादंबऱ्यात आढळतात; तो रोमँटिकपणा नव्हे. ज्ञानेश्वरांच्या शब्दात रोमँटिकपणाचा अर्थ समजून घ्या.

हे शब्देविण संवादिजे। इंद्रियां नेणतां भोगिजे।<br>
बोला आदि झोंबिजे। प्रमेयासी॥ ५८

जैसे भ्रमर परागू नेती। परी कमळदळे नेणती।<br>
तैसी परी आहे सेविती। ग्रंथी इये।।५९

का आपुला ठावो न सांडिता। आलिंगिजे चंद्रु प्रगटता।<br>
हा अनुरागु भोगिता। कुमुदिनी जाणे।।६०

चंद्र उगवल्यावर चंद्रविकासी कमलिनी आपली जागा न सोडता चंद्राला आलिंगते. किंवा 'युगामागुनी चालली रे युगे ही' करावी किती भास्करा वंचना 'किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी, कितीदा करू प्रीतिची याचना!

ही विशुद्ध प्रेमभावना, रोमँटिकपणा ज्ञानेश्वरांच्या कुमुदिनीला विचारा किंवा कुसुमाग्रजांच्या मेदिनीला....

गरज आहे मराठीला असं 'रोमँटिक' करण्याची महाराजा...

(डॉ. मिलिंद इंगळे यांचे भाषण 'ललित' मध्ये प्रसिद्ध झाले होते, त्यावरील प्रतिक्रिया आहे.)

**श्रीमती आशा भिडे**<br>
बी/९ विजय अपार्टमेंट,<br>
आराधना टॉकीजवळ, ठाणे (प) ४००६०२

# दिशा : एप्रिल २००७ - एकअभिप्राय

*श्री. लागू यांनी पाठवलेल्या अभिप्राय तपशिल देत आहोत. वाचकांच्या भावनांचा तो प्रातिनिधिक अभिप्राय आहे. अभिप्रायाबद्दल लागू यांचे आभार !- संपादक*

मा. प्रा. मोहन पाठक,
कार्यकारी संपादक,
व्ही. पी. एम् दिशा (मासिक), यांस
सस्नेह नमस्कार,

मी आपल्या दिशा मासिकाचा वाचक आहे; किंबहुना आपणच मला वार्षिक सभासद, होण्यासाठी प्रवृत्त केलेत, त्याबद्दल धन्यवाद! मासिकांतील सर्व लेख वाचनीय, चिंतनीय तर असतातच पण काही संग्राह्य देखील असतात.

एप्रिल महिन्याच्या अंकातील संपादकीय - 'चष्मे बदलावे लागतील', रामायण - 'एक चिरंतन संस्कार' हा श्री नरेन्द्र नाडकर्णी यांचा लेख, तसेच ''बचत - एक महत्वपूर्ण गरज -बचतीचे संस्कार' हा आपला लेख आणि ''ग्रंथालय संगणकिकरण आणि आधुनिक्किरण हा श्री. श्रीनिवास आठल्ये यांनी लिहिलेला ग्रंथपरिचय सर्व अतिशय आवडले. मी समीक्षक नाही, अथवा मोठा पत्रलेखकही नाही. लेखांविषयी मला जे वाटले, जाणवले ते आपणापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे.

संपादकीयामध्ये म्हटल्याप्रमाणे ''माणसांकडून काम करून घेणे म्हणजेच व्यवस्थापन करणे'' हा विचार कालबाह्य झाला असून चालू जमान्याप्रमाणे आपण बदलणं ही काळाची गरज आहे. आणि म्हणूनच एखादी संस्था, मग ती औद्योगिक असो वा सामाजिक, त्यासाठी चांगले नियोजन, संघटन चातुर्य, कुशल नेतृत्व आणि योग्य नियंत्रण याची गरज आहे.

संपादकीयत शेवटी म्हटल्याप्रमाणे ''साठ वर्षे संपली तरी, विकसनशील देश म्हणून घेण्याचे आपण थांबविले पाहिजे व त्यासाठी शिक्षणावर करावा लागणारा खर्च ही मोठी गुंतवणूक आहे हे मान्य करून आर्थिक दारिद्र्याचे तुणतुणे थांबविले पाहिजे. विकसनशील राहाण्यात समाधान मानण्यापेक्षा विकसित आर्थिक महासत्ता बनायचे असेल तर 'शिक्षणाचे वाणिज्य' मान्य करायला हवे. त्यासाठी ''चष्मे बदलावे लागतील'' आपल्या शैक्षणिक संस्थाचालकांनी, राजकीय नेत्यांनी आणि शिक्षण महर्षींनी या विचारांची नोंद घेण्याची गरज आहे.

रामायण कथा एका वेगळ्या दृष्टिकोनात मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

लेखक म्हणतो,''दशरथ म्हणजे दहा इंद्रियांच्या रथात बसून जीवनाची मार्गक्रमणा करणारा. दशरथाच्या तीन बायका म्हणजे जीवनाच्या खडतर प्रवासात मानवाला सहाय्यभूत ठरणारे; तर दशरथाचे चार पुत्र म्हणजे चार पुरुषार्थ.

धर्माच्या अधिष्ठानाचं सर्वश्रेष्ठ प्रतीक असणारा, राम-प्रभूरामचंद्र म्हणजे साक्षात परमात्मा आणि त्याची पत्नी सीता म्हणजे जीवात्मा. उपनिषदातील दोन पक्ष्यांच्या कथेप्रमाणे, वस्तुतः एकजीव असणारे परंतु अज्ञानाने अलग भासणारे. या आणि अशासारखे आजही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाशी निगडित संदर्भ मनाला पटतात. जिवंत वाटतात. निराळ्या डायमेन्शने लेखकांने रामकथा वाचकांसमोर ठेवली आहे. नाडकर्णी यांचे आभार!

बचतीवरील आपला लेख अतिशय उद्बोधक वाटला. जनसामान्यांना 'बचत' म्हणजे केवळ पैशाचीच असं वाटतं. परंतु आपण म्हटल्याप्रमाणे जीवनांतील लहान सहान बाबींची बचतही महत्त्वाची असते. त्यादृष्टीने मुलांच्यावर हा ''संस्कार'' म्हणून पालकांनी करण्याची गरज आहे.

दुसऱ्याला 'बचत करा' असे आपण नेहमी सांगत असतो, पण आपण ती करतो का? अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे. केवळ पैसा साठविणे म्हणजे बचत, इतका संकुचित अर्थ बचतीत गृहीत नाही. कोणतीही कृत्रिम, नैसर्गिक - उर्जा, कोणतेही वाया जाणारे धन यांची काटकसर म्हणजे बचत अशी अत्यंत समर्पक व्याख्या आपण वाचकांसमोर मांडली आहे.

बचतीची अत्यंत लहान-सहान उदाहरणे आपण लेखात दिली आहेत. दैनंदिन जीवनात ती आपण बघतो, पण अंमलात आणत नाही. त्यांचा उल्लेख या ठिकाणी मी मुद्दाम टाळतो. कारण हा पूर्ण लेख वाचकांनी मूळातून वाचण्याची गरज आहे.

लेखात शेवटी म्हटल्याप्रमाणे, प्रत्येकाने अंतर्मुख होऊन मनाला प्रश्न विचारला पाहिजे आणि ''आदतसे मजबूर'' या सदरातील आपल्या सवयीही बदलल्या पाहिजेत. तरच ''सारे भारतीय माझे बांधव आहेत'' याचा खरा साक्षात्कार होऊ शकेल.

डॉ. द. ना. फडके लिखित ''ग्रंथालय संगणकिकरण आणि आधुनिकीकरण या पुस्तकावरील श्री आठल्ये यांच्या समीक्षणात्मक लेख ''संबंधितांस'' ग्रंथ घेण्यास प्रवृत्त करतो.

आपणासारख्या मुरब्बी आणि कसलेल्या साहित्यिकाच्या हाती कार्यकारी संपादकाची जबाबदारी सोपविली आहे, यामध्ये संपादक डॉ. विजय बेडेकर यांचा दूरदर्शीपणा आणि 'योग्य जागी योग्य माणसाची निवड' हा गुण लक्षात येतो.

यापूर्वीही लिहिणार होतो, परंतु वेळ मिळत नव्हता! अर्थात हे केवळ कारण आहे. आपण नेहमीच मला लेखनाविषयी प्रोत्साहित करीत असता, उद्युक्त करीत असता, त्याबद्दल धन्यवाद!

'दिशा' मासिकास माझ्या हार्दिक शुभेच्छा! आणि या स्तुत्य उपक्रमाबद्दल डॉ. विजय बेडेकर आणि त्यांच्या सर्व टीमला धन्यवाद!

कळावे,

आपला,

सुरेंद्र लागू

२, पहिला मजला, यमुना सोसायटी,
जी. बी. रोड, ठाणे - ४०० ६०१.

•••

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्यापन विषयातील नवीन घडामोडी, नवीन ज्ञात क्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

डॉ. बेडेकर विद्यामंदिर माध्यमिक विभाग शैक्षणिक वर्ष २००७-०८ मधील अभिमानास्पद घडामोडी.

• दिनांक १ मे २००७ महाराष्ट्र दिनानिमित्त सर्व शिक्षकांसाठी श्री. शशिकांत खडतरे यांनी प्रथमोपचार व घरगुती गॅसची काळजी यावर प्रात्यक्षिकांसह व्याख्यान दिले.

• 'सर्व शिक्षा अभियान' अंतर्गत इ. ६वी च्या पुर्नरचित अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण मो. ह. विद्यालय ठाणे येथे १ ते ९ जून दरम्यान संपन्न झाले. सदर प्रशिक्षणास सौ. धोत्रे, सौ. गोतावळे, सौ. कारंडे-जोशी, कु. वाघुले, सौ. शेलार, सौ. सावली माने, सौ. भोईर उपस्थित होत्या. तसेच इ. ८वी च्या इंग्रजी विषयास श्री. आशा जोशी या तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या.

• इ. ९वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी १०वी नवीन अभ्यास-क्रमाचे उन्हाळी-वर्ग दि. १ मे - १५ मे व १-८ जून या काळात घेण्यात आले. वरील वर्गांना सौ. कळमकर (उपमुख्या.) सौ. देशपांडे, आशा जोशी, श्री. सोरटे, सौ. बोऱ्हाडे, सौ. धनगर, सौ. भट, श्री. खैरनार, सौ. सुमिता माने व श्री. जाधव आदी शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

• १८ जून रोजी जाहीर झालेल्या M.T.S परिक्षेस आपल्या शाळेतील कु. प्रणव फिरके १०वी अ याची २ जून रोजी मुलाखत झाली.

• २१ जून रोजी जाहीर झालेल्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल ८८% लागला असून त्यात कुमार मृण्मय कोथळे (८/अ) जिल्ह्यात २९वा, प्रज्ञेश सरवणकर (८/अ) जिल्ह्यात ३८ वा, प्रफुल्ल खेडेकर (८/अ) जिल्ह्यात ४० वा आला. सर्व विद्यार्थ्यांना श्रीमती आशा जोशी यांनी मार्गदर्शन केले होते.

• २२ जून रोजी मुकुंद लिमिटेडच्या सोशल रिस्पॉन्सीबिलिटी उपक्रमांतर्गत इ. ७वी / १०वी च्या मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलीं-करिता ९७ हजार २० रु चा धनादेश शिष्यवृत्ती म्हणून देण्यात आला. कार्यक्रमात महापौर स्मिता इंदुलकर व मीनल बजाज यांच्या हस्ते हा पुरस्कार शाळेच्या वतीने उपमुख्यध्यापिका सौ. उषा कळमकर यांनी स्वीकारला.

• दि २६-जून रोजी सामाजिक न्याय विभाग विशेष जिल्हा समाज-कल्याण अधिकारी ठाणे आयोजित छत्रपती राजर्षी शाहू महाराज १३३वी जयंती तथा सामाजिक न्यायदिन सोहळा व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती धनादेश वितरण सोहळा पार पडला. शाळेतील मागासवर्गीय मुलींना १,००० रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार असून कु. वाघुले कार्यक्रमास उपस्थित होत्या.

• २६ जून रोजी जाहीर झालेल्या S.S.C परिक्षेत शाळेने ९८.६१% निकालासह दैदिप्यमान यश मिळविले.

गुणांनुक्रमे प्रथम आलेले १० विद्यार्थी

| गुणानुक्रमे पहिले दहा | गुण | टक्केवारी |
|---|---|---|
| १. बुगदे चैतन्य मनोकर | ६०३ | ९२.६७ |
| २. जोशी आदित्य अविनाश | ५९६ | ९१.६९ |
| ३. कासार पुजा प्रकाश | ५९५ | ९१.५३ |
| ४. देशमुख पिनकिन सुरेंद्र | ५९३ | ९१.२३ |
| ५. जाधव शीतल भरत | ५८८ | ९०.४६ |

| | | |
|---|---|---|
| ५. वाल्हेकर हर्षद सुशील | ५८८ | ९०.४६ |
| ६. कुलकर्णी सायली विनया | ५८७ | ९०.३० |
| ७. गीठल मयुर बाळराम | ५८५ | ९०.०० |
| ७. नाईक प्रांजलि मिलिंद | ५८५ | ९०.०० |
| ८. भोसले शिशिर राजाराम | ५८१ | ८९.३८ |
| ९. राणे विशाखा सिताराम | ५८० | ८९.२३ |
| ९. वाणी योगिता शाम | ५८० | ८९.२३ |
| १०. गावकर प्राजक्ता सुनिल | ५७९ | ८९.०७ |

**विषयानुसार सर्वाधिक गुण**

| विषय | नाव | गुण |
|---|---|---|
| मराठी | बुगदे चैतन्य मनोहर | ८५ |
| | जोशी आदित्य अविनाश | ८५ |
| हिंदी | कदम पूनम अमरनाथ | ८४ |
| | देवळे शितल पंढरीनाथ | ८४ |
| | घुले अपुर्वा दत्तात्रय | ८४ |
| संस्कृत | पाटील अभिजित आत्माराम | ९८ |
| | वाल्हेकर हर्षद सुशील | ९८ |
| इंग्रजी | भोसले शिशिर राजाराम | ८७ |
| | इनामदार अभिजित श्रीकांत | ८७ |
| | वाल्हेकर हर्षद सुशील | ८७ |
| गणित | ढोंबरे समिरा रमेश | १४८ |
| विज्ञान | बुगदे चैतन्य मनोहर | ९९ |
| समाजशास्त्र | कुलकर्णी सायली विनया | ९५ |

हिंदी, संस्कृत व विज्ञान या विषयांचा निकाल १००% लागला.

• २८ जून रोजी पर्यावरण दक्षता मंचातर्फे पर्यावरण दिनानिमित्त घोषवाक्यांची स्पर्धा घेण्यात आली.

• कुमार आनंद गोरे ६ब, शीतल झेंड ७क. सायली खामकर ८ अ यांना वृक्षमैत्री पुरस्कार देण्यात आला सौ. भट यांनी प्रमुख म्हणून काम पाहीले.

• २९ एप्रिल २००७ मध्ये झालेल्या 'महाराष्ट्र प्रज्ञाशोध' कु. अद्वैत इनामदार याला ठाणे जिल्हा शिष्यवृत्ती मिळाली कौस्तुभ वांबर-कर ९ अ प्रणव फिरके १० अ यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

• शाळेतील ज्येष्ठ शिपाई श्री. बशवंत मोरे ३७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३० जून रोजी सेवा निवृत्त झाले.

• ३ जुलै रोजी सामाजिक वनिकरण विभाग व ठाणे भारत स्काऊट गाईड विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या वृक्षदिंडीत शाळेतील इ. ७वी क चे स्का. गाईडस, गाईड कॅप्टन सौ. आशालता लोखंडे व स्काऊट मास्तर श्री. पांचाळ सहभागी झाले होते.

• फोर कोडस् इंडिया या संस्थेच्या वतीने इ. ६वी-७वी साठी ५जुलै रोजी 'डोळ्यांचे आजार' या विषयावर 'स्लाईड शो' आयोजित केला गेला. संस्थेसाठी विद्यार्थ्यांनी २,६८४ रुपयांचा निधि संकलित केला.

• **महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा निकाल**

इ. ९ वी व ८ वी तील खालील विद्यार्थ्यांची महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा एप्रिल २००७ साठी उत्तम गुणांनी पास होऊन निवड झाली.

| | नाव | | इयत्ता |
|---|---|---|---|
| १. | ओजस गोहाड | राज्यात ४ थी | ९ वी |
| २. | रुचा कारखानीस | राज्यात १८ वी | ९ वी |
| ३. | विराज संघवी | राज्यात २२ वी | ९ वी |
| ४. | वृतिका शाह | जिल्ह्यात ३ री | ९ वी |
| ५. | अश्विनी पावगी | जिल्ह्यात ८ वी | ९ वी |
| ६. | क्षितीजा जाधव | जिल्ह्यात ५ वी | ८ वी |

७. आदित्य रानडे जिल्ह्यात ५ वी ८ वी

• पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा २००७

• माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल

फेब्रुवारी २००७ रोजी आयोजित माध्यमिक



**मार्गदर्शक शिक्षक पूर्व माध्यमिक** (डावीकडून) :- सौ. अंबिके २) सौ. फिरके ३) आशा जोशी (माध्यमिक) ४) सौ. बाघरे (मुख्याध्यापिका पूर्व माध्यमिक) ५) सौ. कळमकर (प्रभारी मुख्याध्यापिका - माध्यमिक) ६) सौ. देशपांडे (प्रभारी उपमुख्याध्यापिका-माध्यमिक) ७) सौ. धर्माधिकारी

**शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी :-** १) प्रज्ञेश सवरणकर (७वा) २) मृण्मय कोथळे (७वा) ३) अंकुर पांचाल (१४वा) ४) प्रणिता काळभोर (६वी) ५) प्रणव पिळणकर (४था) ६) राज पाटील (१४वा) ७) प्रफुल्ल खेडेकर (७वा)

शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ५१ विद्यार्थी बसले होते. त्यातील ६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. त्यांची नावे खालील प्रमाणे -

१) वृषाली प्रसादे ४ थी

२) कृणाल चौधरी २५ वी

३) आश्लेषा पोटदुखे २९ वी

४) अदिती देशपांडे ३३ वी

५) अनुराग गांगल ३९ वा

६) पुष्कर वेलणकर ४० वा

**सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा**

• शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव मिळावा म्हणून चीनमध्ये किशोर विज्ञान तंत्रज्ञान नवकल्पना स्पर्धा (China Adolescent Science and Technology Innovation Contest) आयोजित केली जाते. मागील २१ वर्षे हे कार्य अखंडित चालू आहे. या योजनेतील २२ वी स्पर्धा ३० जुलै ते ५ ऑगस्ट २००७ या कालावधीत, युन्ना राज्यातील कुनमिंग या शहरात आयोजित केली जाणार आहे. या स्पर्धेत प्रामुख्याने चिनी विद्यार्थीच सहभागी होतात. परंतु मागील काही वर्षांपासून चीनखेरीज इतर देशांतील विद्यार्थीदेखील यात सहभागी होऊ लागले आहेत. या स्पर्धेत ठाण्याच्या विद्या प्रसारक मंडळाच्या सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेच्या विद्यार्थ्यांना भाग घेण्याची संधी मिळणार आहे.

मागील वर्षी चीन विज्ञान आणि तंत्रज्ञान संघटना (China Association of Science and Technology) या संस्थेचे काही पदाधिकारी भारतात आले होते. त्यांचा मुक्काम मुंबईत होता तेव्हा, त्यांनी या शाळेला भेट दिली होती. या भेटीत ते शिक्षक आणि विद्यार्थ्यांशी बोलले. विद्यार्थ्यांनी केलेले वेगवेगळे विज्ञान प्रकल्प पाहून ते प्रभावित झाले. त्याचवेळीस त्यांनी विद्यार्थ्यांच्या एका चमूला आपल्या प्रकल्पासह चीनला येण्याचे निमंत्रण दिले. हे निमंत्रण केवळ उत्साहाच्या भरात दिलेले नसून त्या बाबींचा परत गेल्यावर त्यांनी पाठपुरावा केला आणि २२ व्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी औपचारिक निमंत्रण पाठविले. एवढेच नव्हे तर प्रकल्पात काम करणारे विद्यार्थी आणि त्यांचे मार्गदर्शक या सर्वांचा स्पर्धेच्या कालावधीसाठी राहण्याखाण्याचा खर्च करण्याची

तयारी दर्शविली.

सौ. ए.के. जोशीशाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी विज्ञान प्रदर्शनात सतत हिरिरीने भाग घेत असतात. इ.स. २००५ मध्ये त्यांनी केवळ पाण्याचा वापर करून वनस्पतींची वाढ कशी करता येते, यावर प्रकल्प केला होता. या प्रकल्पाने राज्यस्तरावर बक्षीस मिळविले आणि त्याची राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली होती. चीनमधील स्पर्धेसाठी याच प्रकल्पाची निवड करण्यात आली आहे. या प्रकल्पाचे सादरीकरण करण्यासाठी कु. अमला भागवत, कु. निकिता शाह, कु. निहालिका मुंगळे आणि साहील कानेकर हे चार विद्यार्थी जात आहेत. त्यांच्याबरोबर त्यांच्या मार्गदर्शक विज्ञान शिक्षिका सौ. पूर्णिमा साठे आणि सौ. अपर्णा भोळे या देखील जात आहेत. या चमूचे नेतृत्व विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर करणार असून, चमूबरोबर चीनच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान संघटनेच्या खास निमंत्रणावरून होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई येथे कार्यरत असलेले शास्त्रज्ञ, प्रा. सुधाकर आगरकर देखील जात आहेत. या चमूला आपण सर्वजण शुभेच्छा देऊ या.!

• मार्च २००७ ची माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या मुलांचे यश

*गेली काही वर्षे ठाण्यातील प्राच्य विद्या अभ्यास संस्था अशा प्रकारच्या शैक्षणिक सहली विद्या प्रसारक मंडळासह आयोजित करते. लंडन येथे जाणाऱ्या या शैक्षणिक सहली विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी अशा दोन प्रकारच्या असतात. आजवर अनेकांनी याचा लाभ घेतला आहे.*

*इच्छुक शिक्षक विद्यार्थी (वयाची अट लागू) प्राच्यविद्या वा विद्याप्रसारक मंडळ यांच्याशी संपर्क साधू शकतात-*

*- संपादक*

| | |
|---|---|
| एकूण विद्यार्थी - | १९० |
| परीक्षेला बसलेले विद्यार्थी - | १९० |
| उत्तीर्ण विद्यार्थी - | १९० |
| टक्केवारी - | १००% |

| | |
|---|---|
| ९० टक्के व जास्त | २४ |
| ८० ते ९० = | ७९ |
| ७० ते ८० = | ४७ |
| ६० ते ७० = | ३४ |
| ५० ते ६० = | ०६ |
| ४५ पेक्षा कमी = | ०० |
| | १९० |

| गुणानुक्रमे पहिले दहा | गुण | टक्केवारी |
|---|---|---|
| १. तनुज नावर | ६०७ | ९३.३८ |
| २. अक्षता प्रभू | ६०२ | ९२.६१ |
| ३. सर्वेश पडाळकर | ६०० | ९२.३० |
| ३. आनंदकुमार सिंग | ६०० | ९२.३० |
| ४. प्राची जोशी | ५९९ | ९२.१५ |
| ४. दीपिका ताम्हणकर | ५९९ | ९२.१५ |
| ५. संकेत खांबेटे | ५९४ | ९१.३८ |
| ५. तेजश्री श्रृंगारपुरे | ५९४ | ९१.३८ |
| ६. प्रणव पटवर्धन | ५९२ | ९१.०७ |
| ७. शर्वरी सातघरे | ५९० | ९०.७६ |
| ७. स्नेहा धर्माधिकारी | ५९० | ९०.७६ |
| ७. अक्षय ओक | ५९० | ९०.७६ |
| ७. अभिषेक शिंदे | ५९० | ९०.७६ |
| ८. माधुरी साखळकर | ५८९ | ९०.६१ |
| ८. राधिका कुलकर्णी | ५८९ | ९०.६१ |
| ९. अदित्य कानविंदे | ५८८ | ९०.४६ |

| | | |
|---|---|---|
| ९. आनंद उर्सेकर | ५८८ | ९०.४६ |
| ९. मिहीर वैद्य | ५८८ | ९०.४६ |
| ९. निखिल राजे | ५८८ | ९०.४६ |
| १०. करीश्मा जयवंत | ५८७ | ९०.३० |
| १०. सलिल कर्णिक | ५८७ | ९०.३० |

विषयवार सर्वाधिक गुण

| विषय | नाव | गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | सर्वेश पडाळकर | ८३ |
| संस्कृत | किंजल गाला | ९८ |
| | अभिजीत करंदिकर | ९८ |
| | प्रणव पटवर्धन | ९८ |
| | निकिता कलघटगी | ९८ |
| | सलिल कर्णिक | ९८ |
| | तनुज नावर | ९८ |
| | रिचा टिपणीस | ९८ |
| | अक्षता प्रभू | ९८ |
| | आनंदकुमार सिंग | ९८ |
| | आनंद उर्सेकर | ९८ |
| | संकेत खाबेटे | ९८ |
| | स्नेहा धर्माधिकारी | ९८ |
| | प्राची जोशी | ९८ |
| हिंदी | अपूर्व तटकरे | ८४ |
| | भावना जाधव | ८४ |
| | हिरेंद्र शेळके | ८४ |
| मराठी | तनुज नावर | ८७ |
| | सानिका नातु | ८७ |
| गणित | वृतिक निसार | १४९ |
| विज्ञान | दीपिका ताम्हणकर | १०० |
| समाजशास्त्र | प्रणव पटवर्धन | ९८ |
| | तनुज नावर | ९८ |
| | तेजश्री श्रृंगारपुरे | ९८ |

फेब्रु. २००७ - टिळक विद्यापीठ गणित परीक्षेचा निकाल

| | |
|---|---|
| परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची - | १८ |
| उत्तीर्ण झालेले संख्य । विद्यार्थी - | १८ |
| विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या- | ८ |
| प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या - | १० |

सर्वाधिक गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे इ.७ वी

| नाव | गुण |
|---|---|
| प्राची जैसवाल | ९२ |
| मधुरा गोडबोले | ९१ |
| पुर्वा जोशी | ८९ |

•••

## ज्येष्ठ नागरिकांसाठी

*आपण आयुष्यात बरेच उन्हाळे पावसाळे पाहिलेत. खूप बरे वाईट अनुभव घेतले. खूप सोसले आयुष्यभर खस्ता खाल्ल्या.*

*आता आपल्या वृद्धापकाळी या क्षणांच्या आठवणी कोणला तरी सांगाव्यात असे आपणांस वाटत असते. श्री. भास्करराव पांडे यांचा लेख वाचल्यानंतर आपल्या सर्वांना आवाहन करावेस वाटते की, आपण दिशाकडे हे अनुभव पाठवा. आपले अनुभव गद्य व विचार देणारेच असावेत ही मात्र अपेक्षा ! तेव्हा आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहोत.*

संपादक

मुखपृष्ठावरुन
संपादकीय

## स्वातंत्र्याची साठी शांत करणाऱ्या देशाची नियती

स्वातंत्र्य मिळाले ही सुवर्णाक्षरांनी लिहिली गेलेली घटना त्या अक्षरांच्या सोन्याची झळाळी गेल्याने कधीच जुनी झाली. पंधरा ऑगस्ट या एका दिवशी देशभक्तिपर भावना मनात आली म्हणजे झालं! असा विचित्र काळ येऊन ठेपला आहे.

साठ वर्षे लोकशाही अबाधित राहिली, लोकशाही पद्धत राबवणारा जगतात सर्वात मोठा देश हे खरे असले तरी लोकशाहीला आवश्यक असणारे लोकांच्या मनात आदर निर्माण करेल, विश्वास निर्माण असे समर्थ नेतृत्व या देशाला मिळाले नाही हे कटू वाटले तरी सत्य आहे! स्व. पंतप्रधान माननीय जवाहर लाल नेहरू व माननीय लाल बहादूर शास्त्री यांच्या कारकीर्दीतील काही काळ वगळावा लागेल. पण बाकीच्या सर्व कालखंडातील राजकारणामधील संवाद संपलेला आणि भ्रष्ट असलेला इतिहासच डोळ्यापुढे येतो. तापल्या तव्यावर पोळी भाजून घ्यायचे, किंवा अधिक अचूक सांगावयाचे झाल्यास प्रेताच्या टाळूवरील लोणी खायचे स्वार्थी राजकारण हा शापच जणू, या लोकशाही देशाला मिळाला आहे.

'संवाद' हा राज्यकर्ते आणि जनता यांच्यात जसा नाही, तसाच तो तथाकथित, स्वयंघोषित नेत्यांमध्येही नाही. त्यामुळे हे सत्तेला हपापलेले, सत्तालोलुप राजकारणी लोक 'देश' कधी विकायला काढतील, याचा काहीही भरवसा देता येत नाही.

आम्ही मांडत असलेले वास्तव, किती दाहक आणि सत्य आहे हे 'उघड गुपित' आहे. लोकसभा, राज्यसभा, विधानसभा अशा देशाच्या भवितव्याला आकार देणाऱ्या लोकशाही मंदिरांचे या नेत्यांनी आखाडे करुन टाकले. जनतेला तर सोडाच पण स्वत:च्या मनाला लाज वाटेल म्हणून तरी, सभ्य देशामधील नागरिकांसारखे वागून आदर्श ज्या लोकप्रतिनिधींनी निर्माण करावयाचा ते लोकप्रतिनिधीच डॉंबाऱ्याचा खेळ खेळून दाखवत आहेत. (अर्थात, हाताच्या बोटावर मोजता येतील इतके काही अपवाद वगळावे लागतील)

लोकशाही देशाचा विकास 'संवाद' या एका गोष्टीवर अवलंबून असतो. हा संवाद जसा लोकप्रतिनिधी व जनता यांच्यात उरला नाही, तसाच विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्ष यांच्यातही राहिला नाही. कोणत्याही चांगल्या योजनांचा त्यामुळे बोजवाराच उडताना दिसतो. दोन राजकीय पक्षांचे सुमार कार्यकर्तेही एकमेकांसमोर आले की वंश परंपरागत शत्रू असलेल्या दोन देशांतील सैनिक एकमेकांवर तुटून पडावेत, तसे गुरगुरतात. दंगली माजवतात, गुंडागिरी म्हणजे लोकप्रतिनिधी करतात ती, अशी व्याख्याच जणू काही रुढ होऊ घातली आहे. सत्ताधारी काय, विरोधी पक्ष काय, 'अ' पक्ष काय, 'ब' पक्ष काय.... "आपण सारे भारतीय आहोत" ही भावना विसरुनच वावरताहेत.

इतकी टोकाची उद्विग्नता वाटवी असे चित्र असले, तरी काळ्या ढगाला सोनेरी किनार असावी असे काही भविष्यांकित क्षण युवकांच्या सत्याने भेटतात तेव्हा मृगजळात एखादे हिरवेगार रोपटे जगवावे तसे वाटते. माहिती तंत्रज्ञानासह सर्व आधुनिक विषयांमध्ये विमानाच्या वेगवान गतीने प्रगती करत असलेली ही नवीन पिढी 'स्वप्नातला भारत' आणि '२०२० चा (आदर्श असा) महासत्ता' बनू पहाणारा भारत, कदाचित प्रत्यक्षात आणेल. काळ्याकुट्ट चित्र आलेल्या चित्राच्या चौकटीची ही पांढरी किनार भविष्यात तरी हा देश 'भारतीयांचा' होईल ही आशा जिवंत ठेवते. मनाची उमेद वाढवते आणि कार्यप्रवृत्त ठेवते. लोकशाही परिपक्व होईल ही आशा जागती ठेवते साठी शांत करणाऱ्या देशाचे भविष्य उज्ज्वल असावे. प्रकाशमय असावे या सदिच्छा!

•••